*Progressive Education Society's*
**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous)**
**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra.**

**VOLUME 10, ISSUE 8** **AUGUST 2025**

# *MODLIB: E-Bulletin of Library & Information Centre*

## *Glorious Moments of August 2025*









**Published by: Prof. Dr. Nivedita G. Ekbote, Principal, MCASC (Autonomous), Shivajinagar, Pune-5.**
**Editor: Dr. Shantashree Sengupta, Librarian.**
**Editorial Assistant: Mrs. Sarika Sable**
**E-mail: librarian@moderncollegepune.edu.in**

***'MODLIB'*** : E-Bulletin of Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5.

Frequency: Monthly

Mode of Publication: Online

Issue: August 2025

***Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.***

# *Table of Contents*


| Sr.No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 1 | Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote 'स्क्रीन कडून पुस्तकांकडे …' | 5 |
| 2 | Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote felicitated with Jeevan Gaurav Puraskar | 6 - 11 |
| 3 | Hon'ble Prof. Dr. Jyotsna Ekbote felicitated with Adarsh Mata Puraskar | 12 - 15 |
| 4 | Bahurupi Bharud | 16 - 20 |
| 5 | Superannuation Programme of Principal Dr. R. S. Zunjarrao | 21 - 35 |
| 6 | Institutional Social Responsibility (ISR) Activity | 36 - 38 |
| 7 | Events conducted by NSS in August 2025 | |
| | • *Streetplay at Swargate Metro Station* | 40 - 41 |
| | • *Tree Plantation at Kule Paud* | 42 |
| 8 | Library Visit Hour of TYBA Marathi Students | 43 |
| 9 | Events conducted by the Library during August 2025 | |
| | • *Sahityaratna Annabhau Sathe Jayanti* | 44 - 47 |
| | • *Krantisinh Nana Patil Jayanti* | 48 - 50 |
| | • *Sadbhavna Diwas* | 51 - 53 |
| | • *Bhagwan Sarvadnya Shri Chakradhar Swami Avtaar Din Jayanti* | 54 - 56 |

# Table of Contents


| Sr.No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 10 | **Events conducted by the Departments during August 2025** | |
| | • *Department of Marathi: Poetry Book Publication and Balkumar Sahitya Sanstha Prize Distribution* | 58 - 66 |
| | • *Department of Performing Arts : Sahajyog Musical Programme by International Artists, Guru Abhivadan Sohala of Pt. Ramdas Palsule, Innovative Card Games, Musical Programme based on the Poetry of Dr. R. S. Zunjarrao* | 67 - 76 |
| | • *Department of Biotechnology : Guest Lecture on Generic IKS, Katraj Dairy Visit Report, One Day Awareness Programme on Honey Beekeeping, Guest Lecture on Fundamentals of Epigenetics* | 77 - 84 |
| | • *Department of English : Annual Letter Writing Competition* | 85 - 88 |
| 11 | **Faculty Participation in Faculty Development Programmes** | |
| | • *Dr. Vaijayantimala Jadhav, Assistant professor, Department of Marathi* | 90 |
| | • *Dr. P.S. Varade, Associate Professor, Department of Electronic Science* | 91 - 92 |
| 12 | **Modern Achievements** | |
| | • *Manoj Hume, Assistant Professor, Department of Physical Education* | 94 |
| | • *Dr. Ravisha Sawant, Assistant Professor, Department of Botany* | 95 |
| 13 | **Newly added books in the library during August 2025** | 96 |
| 14 | **E-newspaper Clippings** | 98 - 119 |
| 15 | **Condolence Message:** Late Suresh Narayan Patwardhan, Junior Library Assistant | 120 |
| 16 | **Upcoming Events :** September 2025 | 121 |

# Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5.

सकाळ

## 'स्क्रीन'कडून पुस्तकांकडे...

**मोबाईलच्या आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाने वाचनाची सवय कमी होत आहे. वाचनापेक्षा अनेक जण स्क्रीन रोल करण्यात वेळ घालवत आहेत. वाचन आणि मनन लोपणार का, अशी वेळ आली आहे. सावध होऊन, स्क्रीनला रजा देऊन वाचनाला अग्रस्थान द्यायला हवे. पुस्तकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन जागृत करण्याची वेळ आली आहे.**

■ डॉ. गजानन एकबोटे



वडीलधारी मंडळी आणि शाळेतील शिक्षक अनेकदा म्हणायचे, "तुम्ही जे वाचता त्याचप्रमाणे भविष्यात होते." अनेक विचारवंत आणि तत्वज्ञानी वाचनावर भर देतात. पुस्तके वाचणे हे फार पूर्वीपासून अंतर्गत संवादाचे, स्वतःशी संवाद करण्याचे एक साधन मानले जात असे. आजच्या युगात, आत्मचिंतनाचा, जिव्हाळ्याचा मार्ग आणि अनुभव झपाट्याने कमी होत चालला आहे. मोबाईलच्या पडद्यावर स्क्रोल करण्याचा क्षणभंगुर आनंद आता पुस्तकांची पाने उलटण्यात घालवलेल्या वेळेची जागा घेत आहे, जो एकेकाळी आपल्या भावनिक, सामाजिक बौद्धिक जगाचा अविभाज्य भाग होता. आता एक चिंता वाढत आहे: वाचन संस्कृती फक्त ग्रंथालये आणि अभिलेखागारांपुरती मर्यादित होत चालली आहे का? या बदलाचे मूळ, त्यामागील कारणे आणि त्याचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम समजून घेण्याची वेळ आली आहे. त्यामुळे त्याबाबतीत आपण वेळेवर आणि योग्य उपाययोजना करू शकू.

### जीवनशैली बदलली

भारतीय समाजात वाचन हे केवळ शिकण्यापुरते कधीच नव्हते. ते संवेदनशीलता, बौद्धिक कुतूहल आणि आत्मनिरीक्षणाचा प्रवास करण्याचे साधन होते. वाचन सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय माहिती प्राप्त करण्याचा एक उत्कृष्ट मार्ग होता. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, ग्रंथालये, वृत्तपत्रे आणि मासिके यांनी एक चैतन्यशील वाचन संस्कृती आणि परंपरा निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तथापि, गेल्या दशकात, विशेषतः स्मार्ट फोन आणि सोशल मीडियाच्या स्फोटामुळे मनोरंजनाचे प्रकार पूर्णपणे बदलले आहेत. एकेकाळी वाचनातून येणारे अनुभव आता रील्स, शॉर्ट्स, मीम्स आणि छोट्या आकाराच्या व्हिडिओ क्लिप्सद्वारा लवकर व्यक्त केले जातात. आपली वेगवान जीवनशैली आणि लहान, त्वरित संवादाच्या वाढत्या पसंतीमुळे दीर्घ चिंतनशील लेख आणि पुस्तके वाचण्याबाबतचा आपला संयम आणि उत्साह खूपच कमी झाला आहे.

### चिंतनाची क्षमता घटली

इंस्टाग्राम, यू-ट्यूब शॉर्ट्स, फेसबुक रील्स आणि टिकटॉक सारख्या प्लॅटफॉर्मने '३-सेकंदांचा नियम' सादर केला आहे. तरुण पिढी आता दररोज सरासरी ३ ते ५ तास मोबाईल स्क्रीनवर घालवते. वाचनासाठी एकाग्र विचार, कल्पनाशक्ती, चिंतन आणि सतत लक्ष देणे आवश्यक आहे. हे सर्व वर उल्लेख केलेल्या लघु-स्वरूपातील सामुग्रीमध्ये अनुपस्थित आहेत. परिणामी, वाचनाची सवय कमी होत चालली आहेच. त्याचप्रमाणे सखोल विचार करण्याची आणि चिंतन करण्याची आपली क्षमता देखील कमी होत आहे. पूर्वी, शाळांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये दर्जेदार साहित्य वाचणे, वर्गात चर्चा करणे आणि ग्रंथालयांमध्ये वाचन करणे हे आनंदाचा भाग होते.

आज, डिजिटल शिक्षणाच्या नावावर, विद्यार्थी पीडीएफ, व्हॉट्सॲप नोट्स आणि मार्गदर्शक पुस्तकांवर अवलंबून असतात. ते आता ज्ञानासाठी वाचत नाहीत तर गुणांसाठी वाचतात. या बदलामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिंतनशीलता, भाषिक समृद्धता, टीकात्मक विचारसरणी आणि स्वतःला व्यक्त करण्याबाबतचा आत्मविश्वास कमी झाला आहे. निबंध, पत्रे, पुनरावलोकन, चिंतनशील लेख आणि

कथा लिहिण्यात रस असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सुद्धा फारच कमी होत आहे. प्रौढांमध्येही, 'व्हॉट्सॲप विद्यापीठ'च्या उदयामुळे संदर्भहीन आणि अर्थहीन सामग्रीचा आणि मजकुरांचा अनियंत्रित प्रसार आणि धुमाकूळ चालू झाला आहे. 'काहीतरी नवीन आणि रोमांचक' शोधण्याच्या शर्यतीत, आपण आपल्या मनाच्या खोल कोपऱ्यांना स्पर्श करणाऱ्या गोष्टी विसरू लागलो आहोत. बरेच रील हे मूळ पुस्तकांमध्ये आढळणाऱ्या कथांच्या उथळ, विकृत आणि उपद्रवकारक आवृत्त्या आहेत.

संशोधनातून असे दिसून आले आहे की नियमित वाचनामुळे एकाग्रता, मूल्यांवर आधारित निर्णय घेण्याची क्षमता, कल्पनाशक्ती सुधारते, मनावरील ताण कमी करते आणि भावनिक बुद्धिमत्ता व स्मरणशक्ती वाढते. याउलट, सतत स्क्रोलिंग मेंदूमध्ये डोपामाइन (Dopamine) नावाचे द्रव्य तयार करते, ज्यामुळे अल्पकालीन आनंद मिळतो, परंतु दीर्घकालीन समाधान मिळत नाही. यामुळे स्क्रीनचा वेळ संपल्यानंतर रिक्तपणा, चिडचिडेपणा आणि मानसिक थकवा जाणवतो. आजच्या तरुणांमध्ये ही प्रवृत्ती वाढत आहे. त्यामुळे तरुण वयातच मणक्यांचे विकार, ब्लडप्रेशर, मधुमेह, दृष्टिदोष, बद्धकोष्ठता आदींचे प्रमाण वाढले आहे. वाचन हे केवळ ग्रंथालये किंवा शैक्षणिक संस्थांपुरते मर्यादित नसावे. ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे, जी मानसिक आणि सामाजिक विकासाला चालना देते. या संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आपल्याला सकारात्मक पावले लवकर तातडीने उचलण्याची आवश्यकता आहे. दर्जेदार साहित्यासाठी शाळांमध्ये समर्पित वाचन तासांचे आयोजन करावे लागेल. शासन आणि खासगी संस्थांकडून वाचन मोहिमांना प्रोत्साहन द्यावे लागेल त्याचप्रमाणे पाठिंबा द्यावा लागेल. पुस्तकांचे ट्रेलर किंवा छोट्या छोट्या पुनरावलोकनाची उत्कृष्ट पुस्तके आणि साहित्याचा प्रचार प्रसार करण्यासाठी रीलचा उपयोग करावा लागेल. प्रत्येक कुटुंबामध्ये दररोज २० ते ३० मिनिटांचा स्क्रीन-फ्री वाचन वेळ लागू करावा लागेल. वाचनाच्या सवयी जोपासण्यासाठी पुस्तक प्रदर्शने, वाचन क्लब, फिरती ग्रंथालये आणि लेखक संवाद यासारखे अनेक उपक्रम आयोजित करणे आवश्यक आहे.

वाचन कंटाळवाणे होईल किंवा कंटाळवाणे आहे हा गैरसमज आपण दूर केला पाहिजे. खरे तर, बरेच तरुण लेखक आणि पुस्तकप्रेमी वाचन चळवळींचे नेतृत्व करण्यासाठी रील आणि सोशल मीडियाचा वापर करत आहेत. आपल्याला सोशल मीडिया पूर्णपणे नाकारण्याची गरज नाही त्याऐवजी, आपण वाचन सवयींना पाठिंबा देण्यासाठी त्यांचा वापर केला पाहिजे. आपण किती वाचतो हे महत्त्वाचे नाही, तर आपण काय वाचतो आणि ते आपल्या विचारांना आणि बुद्धीला कसे आकार देते हे अतिशय महत्त्वाचे आहे.

रील्स पाहण्यात काही गैर नाही. पण आपण आपल्या मनाला स्थिर आणि पोषण देण्यासाठी पुस्तके जी जागा व्यापतात ती देखील आपण जपली पाहिजे. वाचन म्हणजे केवळ माहिती मिळवणे नाही तर ते आपल्याला विचार करण्याची, प्रश्न विचारण्याची आणि आपल्यामध्ये बदल घडवून आणण्याची शक्ती देते. 'पुस्तके माणसाचे सर्वोत्तम मित्र आहेत' ही म्हण आजही तितकीच खरी आहे. पुस्तकांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन पुन्हा जागृत करण्याची वेळ आली आहे.

**(लेखक पुण्यातील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे कार्याध्यक्ष आहेत.)**

Pune, Main1
20/08/2025 Page No. 4

# Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote Sir, Chairman, P.E.Society, Pune felicitated with Jeevan Gaurav Puraskar

आदरणीय कार्याध्यक्ष प्रा.डॉ. गजानन एकबोटे सरांना गुरुवर्य मो.गो. चाफेकर जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

*गुरूनाम शोभते शिष्य:, शिष्यानाम शोभते गूरू:,*
*उभाभ्याम शोभते शाला, शालानाम शोभते पूरम.*
*हार्दिक अभिनंदन सर.*

शुभेच्छुक
प्रा. शामकांत देशमुख
कार्यवाह ,
पी.ई.सोसायटी




हार्दिक अभिनंदन



# Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote Sir, Chairman, P.E.Society, Pune felicitated with Jeevan Gaurav Puraskar

सकाळ



**पुणे :** पुणे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढीकडून स्व. मो. गो. चाफेकर जीवनगौरव पुरस्कार डॉ. गजानन एकबोटे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते देण्यात आला.

## डॉ. गजानन एकबोटे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**पुणे, ता. २५ :** पुणे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित पुणे जिल्हा आयोजित स्व. मो. गो. चाफेकर जीवनगौरव पुरस्कार प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांना देण्यात आला. वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रातील निःस्पृह कार्यासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह डॉ. निवेदिता एकबोटे, पतपेढीचे अध्यक्ष राज मुजावर, माजी अध्यक्ष विजय कचरे, मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव, पतपेढीचे संचालक शिवाजी कामथे, हेमा मराठे उपस्थित होते.

डॉ. एकबोटे म्हणाले, "माझ्या गुरूंच्या नावाने हा पुरस्कार मिळत आहे, याचा मनस्वी आनंद होत आहे. भारतीय संस्कृतीत गुरूंचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. माझ्या शिक्षकांमुळे मी घडलो. ज्यांना १०० गुण मिळवायचे असतील त्यांनीच माझ्या वर्गात बसावे, असे चाफेकर सर म्हणत असत. त्यांच्यामुळेच मी शिक्षण क्षेत्रात आलो." प्रास्ताविक राज मुजावर यांनी केले. सूत्रसंचालन स्नेहल दामले यांनी केले, तर संचालक महादेव माने यांनी आभार मानले.

Pune, Pune-Today
26/08/2025 Page No. 6

लोकमत

## पुणे बनत आहे आता 'बायो' हब: डॉ. गोसावी

### डॉ. गजानन एकबोटे यांना चाफेकर पुरस्कार प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क



पुणेरी पगडी आणि पुष्पगुच्छ देऊन डॉ. गजानन एकबोटे यांचा सन्मान करताना कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी.

**पुणे :** ऐतिहासिक शहर, सांस्कृतिक राजधानी, विद्येचे माहेरघर, आयटी हब, स्मार्ट सिटी असलेल्या पुण्याची ओळख आता बायो डिझाईन आणि बायो इंजिनिअरिंग हब म्हणून नावारूपास येत आहे. हे आपणास अभिमानाने सांगावे वाटते, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केले.

निमित्त होते, पुणे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढीतर्फे आयोजित स्व. मो. गो. चाफेकर जीवन गौरव पुरस्कार प्रदान समारंभाचे. यात प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांना गौरविण्यात आले. या प्रसंगी डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, हेमा मराठे, पतपेढीचे अध्यक्ष राज मुजावर, माजी अध्यक्ष कचरे, सचिव कल्याण वाघ आदी उपस्थित होते.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे म्हणाले की, माझ्या गुरूच्या नावे माझा सन्मान होतोय, ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. त्यातही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणजे पुण्याचे सांस्कृतिक महापौर डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते होतोय, त्यामुळे अधिक आनंद वाटत आहे. पुणे विद्यापीठाची वाटचाल पाहता मी खासगी विद्यापीठाच्या भानगडीत पडणार नाही, असेही ते म्हणाले.

Pune Main
Page No. 10 Aug 26, 2025
Powered by: erelego.com

# Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote Sir, Chairman, P.E.Society, Pune felicitated with Jeevan Gaurav Puraskar

प्रभात

## डॉ. गजानन एकबोटे यांना जीवनगौरव पुरस्कार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २५ - पुणे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढीतर्फे स्व. मो. गो. चाफेकर जीवन गौरव पुरस्कार प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. गजानन एकबोटे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र, पंचवीस हजार रुपये असे होते.

या वेळी मो. गो. चाफेकर यांच्या कन्या हेमलता मराठे, प्रोग्रेसिव्हचे सहसचिव डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, पतपेढीचे अध्यक्ष राज मुजावर, उपाध्यक्ष दत्तात्रय नाईक, खजिनदार पुष्पक कांदळकर, सचिव डॉ. कल्याण वाघ आणि सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. या वेळी पतपेढीचे निवृत्त सभासद, गुणी पाल्य व गुणवंत सभासद यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कुलगुरूंनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

डॉ. गजानन एकबोटे म्हणाले, मला यापूर्वी विविध क्षेत्रांतील अनेक पुरस्कार मिळाले आहेत. मात्र, हा पुरस्कार माझ्यासाठी विशेष आहे. कारण माझे गुरुवर्य यांच्या नावाने शिक्षक पतपेढीचा पहिला पुरस्कार मला मिळत आहे, हे मी माझे मोठे भाग्य समजतो. राज मुजावर म्हणाले, हा पुरस्कार शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना देण्याचा निर्णय घेण्यात आला आणि यंदा हा पहिला पुरस्कार डॉ. एकबोटे यांना प्रदान करण्यात आला.



पुणे : पुणे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढीतर्फे स्व. मो. गो. चाफेकर जीवनगौरव पुरस्कार प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. गजानन एकबोटे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

Pune City Edition
Aug 26, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

# Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote Sir, Chairman, P.E.Society, Pune felicitated with Jeevan Gaurav Puraskar

नवराष्ट्र
www.navarashtra.com

## 'इंजिनिअरिंग हबमुळे पुणे शहराला नवी ओळख'



**पुणे**, शहर प्रतिनिधी. पुणे शहराला सांस्कृतिक राजधानीची आणि शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर अशी ओळख लाभली आहे. तसेच हे शहर 'एज्युकेशन हब', 'ऑटो हब' म्हणूनही प्रसिद्ध आहे. अलीकडच्या काळात पुणे शहराला बायोडिझाईन आणि बायो इंजिनिअरिंग हब म्हणून नवी ओळख मिळत आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांनी केले.

पुणे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित पुणे आयोजित स्व मो. गो. चाफेकर जीवन गौरव पुरस्कार २०२५ एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात ते बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. गजानन एकबोटे, सुरेश गोसावी, राज मुजुमवार, दत्तात्रय नाईक, पुष्पक कांदळकर, कल्याण वाघ आदी मान्यवर उपस्थित होते. गोसावी म्हणाले, चिकित्सकाचे कार्य म्हणजे जीवन वाचवणे, आलेल्या पेशंटला जीवदान देणे. त्याचप्रमाणे जेव्हा शिक्षण क्षेत्रात येतो, विद्यार्थी घडवायचे असतात. चाफेकर सरांनी मला शिक्षण क्षेत्रात कसे वागायचे आणि कसे बोलायचे हे शिकवले.

Pune Plus Edition
Aug 26, 2025 Page No. 5
Powered by: Navarashtra.com

# Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote Sir, Chairman, P.E.Society, Pune felicitated with Jeevan Gaurav Puraskar

**लोकमत**

## मी अपघाती शिक्षणतज्ज्ञ

माझे गुरू मो. गो. चाफेकर यांच्या नावे दिला जाणारा पुरस्कार मला मिळतोय ही अभिमानाची गोष्ट आहे. मी डॉक्टर म्हणून चांगलं काम करत होतो. पण, एकदा चाफेकर सरांनीच मला संस्थेशी काही बांधिलकी आहे की नाही? असा प्रश्न करत संस्थेवर काम करण्याचे फर्मान काढले. सरांचा आदेश मोडणार कसा? मग मी डॉक्टरकी सांभाळून शिक्षण संस्थेला वेळ देऊ लागलो. पुढे सरांनी निवडणुकीच्या राजकारणात आणलं आणि यात स्वत:ला गाडून घेण्यास भाग पाडलं. जसं मनमोहन सिंग अपघाती पंतप्रधान झाले, तसं मी अपघाती शिक्षण तज्ज्ञ झालो, असे विधान डॉ. गजानन एकबोटे यांनी केले आणि सभागृहात एकच हशा पिकला.



Pune Main
Page No. 2 Aug 28, 2025
Powered by: erelego.com

**लोकमत**



## कुलगुरू मुरलेले, हलक्यात घेऊ नका!

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते माझा सन्मान होतोय, ही आनंदाची बाब आहे. आता माझा परिचय करून देताना सांगण्यात आले की, माझे नाव कुलगुरू पदाच्या शर्यतीत होते म्हणून; पण मी तुम्हाला एक सांगतो, कुलगुरू गोसावी यांच्या दिसण्यावर जाऊ नका. ते भोळे वाटतात; पण खूप मुरलेले आहेत, त्यांना हलक्यात घेण्याची चूक कुणी करू नये, असे विधान डॉ. गजानन एकबोटे यांनी केले. त्यावर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला व हशा पिकला.

Pune Main
Page No. 2 Aug 28, 2025
Powered by: erelego.com

# Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote Sir, Chairman, P.E.Society, Pune felicitated with Jeevan Gaurav Puraskar

पुढारी

## पुणे होतेय बायो- इंजिनिअरिंग हब : डॉ. गोसावी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

पुणे शहराला सांस्कृतिक शहर म्हणून ओळखले जातेच; त्याचबरोबर विद्येचे माहेरघर म्हणूनही ते प्रसिद्ध आहे. आयटी हब म्हणून निर्माण झालेल्या प्रतिमेनंतर आता पुणे शहराला बायो-डिझाइन आणि बायो-इंजिनिअरिंग हब अशी नवी ओळख मिळत आहे. ऊर्जा आणि वैद्यकीय क्षेत्रात जैवतंत्रज्ञानाचा उपयोग कसा करता येईल, यावर येथे संशोधन आणि विचार सुरू आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केले.

पुणे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढीच्या वतीने 'स्व. मो. गो. चाफेकर जीवनगौरव' पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात करण्यात आले.

- पुणे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढीचा 'स्व. मो. गो. चाफेकर स्मृती जीवनगौरव' पुरस्कार डॉ. गजानन एकबोटे यांना प्रदान

या वेळी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांना 'स्व. मो. गो. चाफेकर जीवनगौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी मो. गो. चाफेकर यांच्या कन्या हेमलता मराठे, प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, पतपेढीचे अध्यक्ष राज मुजावर आदी उपस्थित होते.

My Pune Edition
Sep 12, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# Hon'ble Prof. Dr. Mrs. Jyotsna G. Ekbote, Joint Secretary, P.E.Society, Pune and Chairperson, CDC, Modern College, Pune-5 felicitated with 'Adarsh Mata Puraskar'

सकाळ

## जाधवर इन्स्टिट्यूटचे आदर्श माता पुरस्कार जाहीर

पुणे, ता. २५ : जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटकडून 'आदर्श माता' पुरस्कार विमला भंडारी, कुशावर्ता गीते, प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे यांना जाहीर झाला. नऱ्हे येथे हा कार्यक्रम रविवारी (ता. ३१) सकाळी १० वाजता होणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दूल जाधवर यांनी दिली. पुरस्कार वितरण सोहळ्याला ज्येष्ठ समाजसेविका पुष्पा नडे, माजी महापौर कमल व्यवहारे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दूल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर उपस्थित राहणार आहेत.

Pune, Pune-Today
26/08/2025 Page No. 6

सामना

## भंडारी, गीते, प्रा. एकबोटे यांना 'आदर्श माता पुरस्कार'

पुणे, दि. २५ (प्रतिनिधी) – जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे देण्यात येणारा 'आदर्श माता पुरस्कार' विमला भंडारी, कुशावर्ता गीते, प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे यांना जाहीर झाला आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

३१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता नऱ्हे येथील प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. ज्येष्ठ समाजसेविका पुष्पा नडे, माजी महापौर कमल व्यवहारे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम विनामूल्य असून, जास्तीत जास्त पुणेकरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ॲड. जाधवर यांनी केले.

Pune Edition
Aug 26, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

## भंडारी, गिते, एकबोटे यांना 'आदर्श माता' पुरस्कार जाहीर

पुणे : जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या वतीने सातवा आदर्श माता पुरस्कार विमला भंडारी, कुशावर्ता गीते, प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे यांना प्रदान करण्यात येणार आहे. रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता नऱ्हे येथील प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे, पुरस्कार वितरण सोहळ्याला ज्येष्ठ समाजसेविका पुष्पा नडे, माजी महापौर कमल व्यवहारे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.
साडी, श्रीफळ, पुणेरी पगडी, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्काराचे यंदा सातवे वर्ष असून संस्थेच्या खजिनदार सुरेखा सुधाकरराव जाधवर यांच्या वाढदिवसानिमित्त हा विशेष सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

My Pune Edition
Aug 26, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

Pudhari 26.8.2025



# Hon'ble Prof. Dr. Mrs. Jyotsna G. Ekbote, Joint Secretary, P.E.Society, Pune and Chairperson, CDC, Modern College, Pune-5 felicitated with 'Adarsh Mata Puraskar'

लोकमत

# क्विक Update

## जाधवर ग्रुपचा सातवा आदर्श माता पुरस्कार

**पुणे :** जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्युट्सच्या वतीने यंदा सातवा आदर्श माता पुरस्कार विमला भंडारी, कुशावर्ता गीते, प्रा.डॉ.ज्योत्स्ना एकबोटे यांना प्रदान करण्यात येणार आहे. रविवार (दि. ३१) सकाळी १० वाजता नऱ्हे येथील प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर सभागृहात समाजसेविका पुष्पा नडे, माजी महापौर कमल व्यवहारे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

Hello Pune
Page No. 5 Aug 26, 2025
Powered by: erelego.com

## भंडारी, गिते, प्रा.डॉ. एकबोटे यांना आदर्श माता पुरस्कार

**पुणे :** जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट्स् च्यावतीने सातवा आदर्श माता पुरस्कार विमला भंडारी, कुशावर्ता गीते, प्रा.डॉ.ज्योत्स्ना एकबोटे यांना प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे वितरण ३१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता नऱ्हे येथील प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर सभागृहात होणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुरस्कार वितरण सोहळ्याला ज्येष्ठ समाजसेविका पुष्पा नडे, माजी महापौर कमल व्यवहारे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पुरस्काराचे यंदा सातवे वर्ष असून संस्थेच्या खजिनदार सुरेखा सुधाकरराव जाधवर यांच्या वाढदिवसानिमित्त हा विशेष सोहळा आयोजित करण्यात आला आहे. शार्दुल जाधवर म्हणाले, जितो एपेक्स इंटरनॅशनलचे विजय भंडारी यांच्या विमला भंडारी या मातोश्री आहेत. तर, तौरल इंडियाचे संस्थापक भरत गीते यांच्या मातोश्री कुशावर्ता गीते या दुसऱ्या पुरस्कारार्थी आहेत. तसेच तिसऱ्या पुरस्कारार्थी प्रा.डॉ.ज्योत्स्ना एकबोटे या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह प्रा.डॉ.निवेदिता एकबोटे यांच्या मातोश्री आहेत.

Kesari 26.8.2025

प्रभात

## डॉ. जोत्स्ना एकबोटे यांना आदर्श माता पुरस्कार जाहीर

### विमला भंडारी, कुशावर्ता गीते यांचाही रविवारी सन्मान

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २६ -** जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस्च्या वतीने सातवा आदर्श माता पुरस्कार विमला भंडारी, कुशावर्ता गीते, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे यांना जाहीर झाला आहे. येत्या रविवारी (दि. ३१) सकाळी १० वाजता नऱ्हे येथील प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली.



पुरस्कार वितरण सोहळ्याला ज्येष्ठ समाजसेविका पुष्पा नडे, माजी महापौर कमल व्यवहारे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर आदी उपस्थित राहतील. पुरस्काराचे यंदा सातवे वर्ष आहे.

ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, जितो ॲपेक्स इंटरनॅशनलचे विजय भंडारी यांच्या विमला भंडारी या मातोश्री आहेत, तर तौरल इंडियाचे संस्थापक भरत गीते यांच्या मातोश्री कुशावर्ता गीते या दुसऱ्या पुरस्कारार्थी आहेत

तिसऱ्या पुरस्कारार्थी डॉ. ज्योत्स्ना एकबोटे या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांच्या मातोश्री आहेत. विविध क्षेत्रांतील या दिग्गज व्यक्तिमत्त्वांना घडवून समाजसेवेचे धडे दिल्याबद्दल कृतज्ञता म्हणून या मातांना गौरविण्यात येणार आहे.

Pune City Edition
Aug 27, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

# Hon'ble Prof. Dr. Mrs. Jyotsna G. Ekbote, Joint Secretary, P.E.Society, Pune and Chairperson, CDC, Modern College, Pune-5 felicitated with 'Adarsh Mata Puraskar'








# Hon'ble Prof. Dr. Mrs. Jyotsna G. Ekbote, Joint Secretary, P.E.Society, Pune and Chairperson, CDC, Modern College, Pune-5 felicitated with 'Adarsh Mata Puraskar'

**पुण्यनगरी**

## स्त्रीमध्ये पिढ्या घडवण्याची ताकद

**पुणे** : असंख्य योन्यांमधून मिळालेला मानवजन्म हा मोठा लाभ आहे आणि या जन्मात सतत चांगल्या गोष्टी घडवत राहिले पाहिजे. यातही स्त्रीजन्म मिळणे हे आणखी भाग्याचे, कारण स्त्रीमध्ये ममत्व असते, पिढ्या घडविण्याची ताकद असते, असे मत ज्येष्ठ समाजसेविका पुष्पा नडे यांनी व्यक्त केले.

जाधवार ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट्सच्या वतीने ७ वा आदर्श माता पुरस्कार विमला भंडारी, कुशार्वता गीते, प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे यांना नऱ्हे येथील संस्थेच्या सभागृहात प्रदान करण्यात आला. यावेळी माजी महापौर ॲड. कमल व्यवहारे, अक्षरधाम मंदिर पवईचे विश्वानंद परमहंस सद्गुरु स्वामी, जितो एपेक्स इंटरनॅशनलचे विजय भंडारी, तौरल इंडियाचे संस्थापक भरत गीते, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर उपस्थित होत्या.

Pune Edition

Sep 10, 2025 Page No. 1

Powered by: erelego.com

# बहुरूपी भारुड


सस्नेह निमंत्रण
गुरुवार,
दि. २१ ऑगस्ट २०२५
वेळ
दुपारी ४. ३० वाजता
स्थळ
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सभागृह, शिवाजीनगर, पुणे ०५
॥ ज्ञानमयो भव ॥
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे – ५
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न एक स्वायत्त संस्था)
NAAC A++ & NBA Accredited
रौप्य २५ महोत्सव
" बहुरूपी भारूड "
(अध्यात्मिक व नैतिक शिकवण देणारे रूपकात्मक संत साहित्य)
सादरकर्ते
प्रसिद्ध किर्तनकार डॉ. श्री. भावार्थ रामचंद्र देखणे
(विश्वस्त , श्री. ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी , पुणे)
प्रमुख पाहुणे
मा. प्रा. डॉ. सुरेश गोसावी
कुलगुरू , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे
कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी
या कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
-: आपले स्नेहांकित :-
प्रा. शामकांत देशमुख
सचिव, प्रो. ए. सोसायटी
समन्वयक, मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय
प्रा. डॉ. सौ. ज्योत्स्ना एकबोटे
सह- सचिव, प्रो. ए. सोसायटी
अध्यक्षा, महाविद्यालय विकास समिती
प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे
उप-सचिव, प्रो. ए. सोसायटी
प्रा. डॉ. कल्याणी जोशी
प्राचार्या, प्रो. ए. सो.
मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय
सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी


॥ ज्ञानमयो भव ॥
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे - ५
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न एक स्वायत्त संस्था)
NAAC A++ & NBA Accredited
रौप्य २५ महोत्सव
। सस्नेह निमंत्रण ।
बहुरूपी भारूड
(अध्यात्मिक व नैतिक शिकवण देणारे रुपकात्मक संत साहित्य)
सादरकर्ते
प्रसिद्ध कीर्तनकार डॉ. श्री भावार्थ रामचंद्र देखणे
(विश्वस्त - श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी, पुणे)
प्रमुख पाहुणे
मा.प्रा.डॉ. सुरेश गोसावी
कुलगुरु - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा.प्रा.डॉ. गजानन र. एकबोटे
कार्याध्यक्ष - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी
या कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
21 ऑगस्ट 2025, गुरुवार
दुपारी ४.३० वाजता
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सभागृह, शिवाजीनगर, पुणे ०५
- आपले स्नेहांकित -
प्रा.शामकांत देशमुख
सचिव - प्रो.ए. सोसायटी
समन्वयक - मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय
प्रा.डॉ.सौ. ज्यौत्स्ना एकबोटे
सहसचिव - प्रो.ए. सोसायटी
अध्यक्षा - महाविद्यालय विकास समिती
प्रा.डॉ. निवेदिता एकबोटे
उपसचिव - प्रो.ए. सोसायटी
प्रा.डॉ. कल्याणी जोशी
प्राचार्या - प्रो.ए.सो. मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय

# बहुरूपी भारुड २१.८.२०२५

संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी येथील विश्वस्त आणि पालखी सोहळा प्रमुखपदी डॉ. भावार्थ रामचंद्र देखणे व प्रसिद्ध कीर्तनकार गायक श्री. अवधुत गांधी यांच्यासह ४० कलाकारांनी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी मध्ये प्रचंड गाजलेले बहुचर्चित असे बहुरूपी भारूड सादर केले.

महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री नामदार चंद्रकांत दादा पाटील, कुलगुरू गोसावी सर, प्र कुलगुरू काळकर सर, डॉ. गजानन एकबोटे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत व तुडुंब भरलेल्या सभागृहात हा सोहळा संपन्न झाला.









# बहुरूपी भारुड २१.८.२०२५

मुख्य पृष्ठ › पुणे शहर › बहुरूपी भारूड टाळी वाजवावी, गुढी उभारावी वाट ती चालावी पंढरीची : डॉ...

पुणे शहर

## बहुरूपी भारूड टाळी वाजवावी, गुढी उभारावी वाट ती चालावी पंढरीची : डॉ भावार्थ देखणे यांचे देखणे सादरीकरण

च्या कडून **मॅकन्युज प्रतिनिधी** - 21/08/2025




पुणे :

पी ई सोसायटीच्या मॉडर्न ईंजिनिअरींगच्या रौप्यमहोत्सवा निमित्त आध्यात्मिक व नैतिक शिकवण देणारे रुपकात्मक संत साहित्याचे सादरीकरण बहुरूपी भारूड या कार्यक्रमात सादर झाले. डॉ भावार्थ देखणे विश्वस्त श्री. ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी, पुणे यांनी सादर केलेल्या कार्यक्रमात सादर केले.

# बहुरूपी भारुड २१.८.२०२५

सुरवातीला प्राचार्य डॉ. कल्याणी जोशी यांनी प्रास्ताविक करताना महाविद्यालयाच्या दैदीप्यमान वाटचालीचा आढावा घेतला. पी ई सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी सांस्कृतिची जतन करण्यासाठी असे कार्यक्रम घेतले जातात. डॉ. रामचंद्र देखणे हे लोककलेचे उपासक होते. त्यांचा वारसा त्यांचे सुपुत्र प्रसिध्द किर्तनकार डॉ. भावार्थ देखणे असेच चालु ठेवतील अशा शुभेच्छा दिल्या.

डॉ. देखणे यांनी वासुदेव, कडकलक्ष्मी, भारूड असे कलाप्रकार सादर केले. त्यांना अभय नलगे यांनी साथ दिली. कार्यक्रमाची भैरवी लोकप्रिय गायक अभय गांधी यांनी सादर केली. त्यांचाच पसायदान गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. प्रमुख उपस्थिती ना चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्रशिक्षण व संसदीय कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य कार्यक्रमाचे आध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे, कार्याध्यक्ष, पी ई सोसायटी प्र कुलगुरू डॉ पराग कालकर उपस्थित होते.

कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. जोत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह डॉ. निवेदिता एकबोटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपप्राचार्या डॉ ,सुहासिनी ईटकर यांनी केले.

# बहुरूपी भारुड २१.८.२०२५

लोकमत

## 'बहुरूपी भारूड'मधून केला मानवी मूल्यांचा जागर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सत्वर पाव गे मला भवानी आई रोडगा वाहिन तुला..., दार उघड बया दार उघड..., गोंधळी, भैरवी, वासुदेव, पोतराज आदी भारूडाच्या रूपकातून मानवी मूल्यांचा जागर करण्यात आला. अध्यात्म, नैतिकता व सामाजिक जाणीवांची शिकवण देण्याचं काम डॉ. भावार्थ देखणे यांनी गुरुवारी केले. रसिक श्रोत्यांनीही टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

निमित्त होते, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे येथे महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या 'बहुरूपी भारूड' या सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यक्रमाचे. याप्रसंगी मंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, सचिव प्रा. शामकांत देशमुख, प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, प्राचार्य डॉ. कल्याणी जोशी आदी उपस्थित होते.

Pune Main
Page No. 9 Aug 22, 2025
Powered by: erelego.com

प्रभात

## 'बहुरूपी भारूडा'ला रसिक श्रोत्यांची भरभरून दाद

### 'प्रोग्रेसिव्ह'च्या मॉडर्न महाविद्यालयात संत साहित्याचा अध्यात्मिक संगम

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २३ - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रसिद्ध कीर्तनकार, आळंदीच्या ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांच्या बहुरूपी भारूड सादरीकरणाला रसिक श्रोत्यांकडून टाळ्यांच्या गजरात भरभरून दाद मिळाली. त्यांनी वासुदेव, पोतराज, दार उघड बया दार उघड, गोंधळी, भैरवी यांसारख्या भारुडांद्वारे अध्यात्म, नैतिकता आणि सामाजिक भान यांचा प्रभावी संदेश उपस्थितांना दिला. मॉडर्न महाविद्यालयात बहुरूपी भारूड या आगळावेगळ्या सांस्कृतिक व अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आणि संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांच्या संकल्पनेतून हा विशेष कार्यक्रम सादर करण्यात आला.

कार्यक्रमास उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांची उपस्थिती होती. कुलगुरूंनी संत साहित्याच्या अभ्यासातून जीवनमूल्ये आत्मसात करण्याचे महत्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गजानन एकबोटे होते. अशा प्रकारच्या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. अध्यात्म, संस्कृती आणि शिक्षण यांचा संगम घडवून आणणे ही काळाची गरज असल्याचे ते म्हणाले.

यावेळी संस्थेचे सचिव प्रा. शामकांत देशमुख, सहसचिव डॉ. ज्योत्स्ना एकबोटे व उपसचिव डॉ. निवेदिता एकबोटे यांचीही उपस्थिती होती. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. कल्याणी जोशी यांनी केले. आभार प्रदर्शन सुहासिनी इटकर यांनी केले.



पुणे : डॉ. भावार्थ देखणे यांच्या बहुरूपी भारूड सादरीकरणाला रसिक श्रोत्यांकडून टाळ्यांच्या गजरात भरभरून दाद मिळाली.

Pune City Edition
Aug 24, 2025 Page No. 15
Powered by: erelego.com

# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा ३०.८.२०२५




## मूल्यव्यवस्था मजबूत करणारे उत्तम प्रशासक डॉ. राजेंद्र झुंजाराव: डॉ.एन.एस. उमराणी

पुणे ३०: २०४७ साली विकसित भारत घडवायचा असेल तर विद्यार्थ्यांना अध्यापन आणि अध्ययन प्रक्रियेत केंद्रीभूत ठेवणे आवश्यक आहे. मॉडर्न महाविद्यालय हे केवळ महाविद्यालय नाही तर विद्यापीठाची क्षमता असलेले विद्यापीठ आहे असे उद्गार प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांच्या "सेवापूर्ती कार्यगौरव सोहळयाच्या निमित्ताने त्यांनी काढले.

# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा ३०.८.२०२५

महाविद्यालय आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यात प्राचार्यांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. प्राचार्यांची एकूणच कारकिर्द समाधानकारक राहिली, अतिशय सौम्य आणि नम्र राहून त्यांनी महाविद्यालयाचा कार्यभार सांभाळला असे गौरवोद्गार त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये काढले.

सेवापूर्ती कार्यगौरव सोहळ्याचे प्रास्ताविक आणि स्वागत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह मा. प्रा. शामकांत देशमुख सर यांनी केले. सरांच्या प्रदीर्घ कारकीर्दीचा त्यांनी आढावा घेतला. यावेळी सरांच्या महाविद्यालयातील 37 वर्षांच्या प्रदीर्घ सेवाकालावर आधारित तयार केलेली चित्रफित दाखवण्यात आली. प्रा. समीर नेर्लेकर सर, यांनी ही चित्रफित तयार केली आहे. यावेळी महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापकांच्या वतीने डॉ.अमृता ओक यांनी आपले आपले मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातील शिक्षकेतर सहकाऱ्यांच्या वतीने प्रातिनिधिक मनोगत महाविद्यालायचे प्रबंधक श्री.गणेश साठे यांनी व्यक्त केले. मॉडर्न महाविद्यालयाच्या नवनियुक्त प्राचार्या आदरणीय डॉ. निवेदिता एकबोटे मॅडम आपले मनोगत व्यक्त केले. मॉडर्न महाविद्यालय आणि प्राचार्य यांचा असलेला घनिष्ठ संबंध आणि महाविद्यालयाची झालेली यशस्वी घोडदौड महत्त्वाची असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. संस्थेचे उपकार्याध्यक्ष डॉ.झुंजारराव सरांचे पीएचडी मार्गदर्शक असलेले आदरणीय डॉ. अरविंद पांडे सर यावेळी उपस्थित होते. त्यांनी प्राचार्य झुंजारराव सरांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्यवाह प्रा.डॉ.सौ.ज्योत्स्ना एकबोटे यांनी प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी नेहमीच अत्यंत सामंजस्याने महाविद्यालयातील प्रशासन हाताळले असे मत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना मा. प्रा. डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी आपल्या कार्याप्रती, संस्थेप्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपप्राचार्य प्रा. डॉ. सौ. अंजली सरदेसाई यांनी केले. सौ. स्वाती पटवर्धन, सौ.रेणू भालेराव यांनी पसायदान सादर केले. सूत्रसंचालन डॉ.वैजयंती जाधव यांनी केले.

# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा
# ३०.८.२०२५
















# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा
# ३०.८.२०२५













# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा
# ३०.८.२०२५














# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा ३०.८.२०२५














# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा
# ३०.८.२०२५
















# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा
# ३०.८.२०२५















# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा
# ३०.८.२०२५













# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा
# ३०.८.२०२५













# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा
# ३०.८.२०२५








# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा
# ३०.८.२०२५














# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा ३०.८.२०२५

**प्रभात**

# मूल्यव्यवस्था मजबूत करणारे उत्तम प्रशासक

## डॉ. राजेंद्र झुंजारराव यांच्या सेवापूर्ती सोहळ्यात मान्यवरांकडून कार्याचा गौरव

**प्रभात वृत्तसेवा**



**पुणे, दि. ३१** - विकसित भारताचे स्वप्न साकार करायचे असेल, तर विद्यार्थ्यांना शिक्षण प्रक्रियेच्या केंद्रस्थानी ठेवावे लागेल. मॉडर्न महाविद्यालय हे केवळ महाविद्यालय नसून ते एका विद्यापीठाची क्षमता बाळगते आणि या संस्थेची मूल्यव्यवस्था मजबूत करण्यात प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचे योगदान अग्रस्थानी आहे, अशा शब्दांत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी डॉ. झुंजारराव यांच्या कार्याचा गौरव केला.

निमित्त होते प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांच्या सेवापूर्ती कार्यगौरव सोहळ्याचे. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमात डॉ. झुंजारराव यांच्या ३८ वर्षांच्या प्रदीर्घ आणि यशस्वी कारकिर्दीला उजाळा देण्यात आला. या वेळी डॉ. राजेंद्र झुंजारराव, सचिव प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, महाविद्यालयाच्या नवनियुक्त प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे, डॉ. झुंजारराव यांचे पीएच.डी. मार्गदर्शक डॉ. अरविंद पांडे उपस्थित होते.

डॉ. उमराणी म्हणाले, डॉ. झुंजारराव हे एक उत्तम प्रशासक असून, सर्वसमावेशकता आणि वैविध्यता हे त्यांचे महत्त्वाचे गुण आहेत. महाविद्यालयात उत्तमतेचा ध्यास घेऊन त्यांनी एक वेगळा ठसा उमटवला आहे. डॉ. गजानन एकबोटे म्हणाले, प्राचार्य डॉ. झुंजारराव यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख सातत्याने उंच ठेवला. संस्थेला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. अत्यंत सौम्य आणि नम्र स्वभावाने त्यांनी महाविद्यालयाचा कार्यभार सांभाळला. डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी कृतज्ञतेची भावना व्यक्त करत संस्था आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. वैजयंती जाधव यांनी केले, तर उपप्राचार्या डॉ. अंजली सरदेसाई यांनी आभार मानले.

Pune City Edition
Sep 01, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

# 'मूल्यव्यवस्था मजबूत करणारे डॉ. राजेंद्र झुंजारराव उत्तम प्रशासक'



**पुणे** : विकसित भारत घडवायचा असेल तर विद्यार्थ्यांना अध्यापन आणि अध्ययन प्रक्रियेत केंद्रीभूत ठेवणे आवश्यक आहे. मॉडर्न महाविद्यालय हे केवळ महाविद्यालय नाही तर विद्यापीठाची क्षमता असलेले विद्यापीठ आहे, असे उद्गार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र.कुलगुरु डॉ. एन.एस. उमराणी यांनी काढले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांच्या सेवापूर्ती कार्यगौरव सोहळ्यात ते बोलत होते. डॉ.राजेंद्र झुंजारराव उत्तम प्रशासक असून सर्वसमावेशक आणि वैविध्यता हे गुण त्यांच्याकडे आहेत. महाविद्यालयातील मूल्यव्यवस्था मजबूत करण्यात, उत्तमतेचा ध्यास घेण्यात प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव अग्रस्थानी आहेत, असे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षस्थानी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे होते. महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख सतत उंच ठेवण्याचे कार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी केले, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

ते म्हणाले, महाविद्यालय आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात प्राचार्यांचा मोठा वाटा असतो. झुंजारराव यांनी महाविद्यालयाचा कार्यभार समर्थपणे सांभाळला.

प्रास्ताविक प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख यांनी केले.

यावेळी प्राचार्य झुंजारराव यांच्या प्रदीर्घ सेवाकालावर आधारित चित्रफित तयार करण्यात आली आहे. प्रा. समीर नेर्लेकर यांनी ही चित्रफित तयार केली. प्राध्यापकांच्या वतीने डॉ.अमृता ओक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातील शिक्षकेतर सहकाऱ्यांच्या वतीने प्रातिनिधिक मनोगत महाविद्यालयाचे प्रबंधक गणेश साठे यांनी व्यक्त केले. मॉडर्न महाविद्यालयाच्या नवनियुक्त प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे, प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांचेही भाषण झाले.

सत्काराला उत्तर देताना प्रा. डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी आपल्या कार्याप्रती, संस्थेप्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. आभार प्रा.अंजली सरदेसाई यांनी मानले. , सूत्रसंचालन डॉ.वैजयंती जाधव यांनी केले.

Kesari 1.9.2025

# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा ३०.८.२०२५

सकाळ



**शिवाजीनगर :** डॉ. झुंजारराव यांचा सत्कार करताना डॉ. गजानन एकबोटे.

## डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा गौरव

**शिवाजीनगर, ता. ३१ :** "मॉडर्न महाविद्यालय हे केवळ महाविद्यालय नाही, तर विद्यापीठाची क्षमता असलेले विद्यापीठ आहे. तसेच प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव हे उत्तम प्रशासक असून सर्वसमावेशक आणि वैविध्यता हे गुण त्यांच्याकडे आहेत. महाविद्यालयातील मूल्यव्यवस्था मजबूत करण्यात, उत्तमतेचा ध्यास घेण्यात ते अग्रस्थानी आहेत" असे उद्गार डॉ.एन. एस. उमराणी यांनी काढले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगरमधील मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा नुकताच पार पडला, यावेळी डॉ. उमराणी बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे होते. सत्काराला उत्तर देताना डॉ. झुंजारराव यांनी आपल्या कार्याप्रती व संस्थेप्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख यांनी केले. डॉ. अमृता ओक, प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. अरविंद पांडे व प्रा. डॉ ज्योत्स्ना एकबोटे उपस्थित होत्या. डॉ. वैजयंती जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. अंजली सरदेसाई यांनी आभार मानले. स्वाती पटवर्धन यांनी पसायदान सादर केले.

Pune, Pune-Today
01/09/2025 Page No. 6

# प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा
# ३०.८.२०२५

नवभारत
www.navbharatlive.com

# NEWS विंडो

## सेवानिवृत्त डॉ. राजेंद्र झुंजारराव का सम्मान

पुणे. पी.ई. सोसायटी के मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर के प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव प्राचार्य पद पर 18 साल का कार्यकाल पूरा करने के बाद सेवानिवृत्त हो गए. इस अवसर पर उनकी पत्नी और अधिवक्ता विद्या झुंजारराव भी मौजूद थीं. उनका सेवा निवृत्ति समारोह सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के पूर्व उप-कुलपति डॉ. एन.एस. उमराणी की मुख्य उपस्थिति में संपन्न हुआ. डॉ. उमराणी ने कहा कि एक सर्वसमावेशी और कवि हृदय वाला व्यक्ति आज सेवानिवृत्त हो रहा है. उन्होंने कहा कि डॉ. झुंजारराव ने अपने काम से कॉलेज को एक नई ऊंचाई पर पहुंचाया है.

Pune plus Edition
Sep 01, 2025 Page No. 2
wered by: navbharatlive.co

नवभारत
www.navbharatlive.com

## सीखने की प्रक्रिया पर ध्यान देना होगा

पुणे. प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी द्वारा संचालित मॉडर्न आर्ट्स, साइंस एंड कॉमर्स कॉलेज के प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंझरराव सेवानिवृत्त हो गए. उनके सम्मान में आयोजित कार्यक्रम में उपस्थित डॉ. एन.एस. उमराणी ने कहा कि यदि हम 2047 में एक विकसित भारत का निर्माण करना चाहते हैं, तो हमारे देश के विद्यार्थियों को शिक्षण और सीखने की प्रक्रिया पर केंद्रित रखना बेहद जरूरी है. उन्होंने कहा कि डॉ. झुंझरराव एक उत्कृष्ट प्रशासक रहे हैं. उनमें समावेशिता और विविधता के गुण हैं. कॉलेज की मूल्य प्रणाली को मज़बूत करने और उत्कृष्टता की इच्छा जगाने में उनका योगदान महत्वपूर्ण हैं. कार्यक्रम की अध्यक्षता प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के अध्यक्ष प्रो. डॉ. गजानन एकबोटे ने की. उन्होंने कहा, डॉ. झुंझरराव ने महाविद्यालय की प्रगति के ग्राफ को ऊंचा बनाए रखने का कार्य किया है. समारोह की प्रस्तावना प्रो. शामकांत देशमुख ने किया.

Pune plus Edition
Sep 03, 2025 Page No. 2
owered by: navbharatlive.co

# Institutional Social Responsibility (ISR) Activity

## ISR report

### Interaction and visit for Financial Assistance by Samarthanam Trust, Pune for Academic Year 2025-26

Authorities from Samarthanam Trust, Pune visited Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar on 21st August 2025 to meet and interact with the Scholarship beneficiaries, the funds for which are being provide by TIAA Global Capabilities. TIAA Global Capabilities through their CSR initiatives provided scholarships of Rs. 11 lakh to 57 students of the Modern College of Arts, Science and Commerce in the academic year 2024-25 and are keen to continue supporting students in the current academic year as well. For the academic year 2025-26, 36 students have been selected as beneficiaries and will be receiving the scholarship.

A short interactive session was arranged by the ISR committee of our college which was co-ordinated by Dr. Shubhangi Puranik, VP (P.G. Section) and Chairperson, ISR committee. Mr. B.S. Raghavendra, Program Manager- Higher Education, Samarthanam Trust; Mr. Chandan Soni, Samarthanam Trust; Dr. Shubhangi S. Puranik Vice Principal( P.G section), chairperson- ISR committee and Student Development Officer, Dr Sachin sakate, VP (Science Faculty), Dr. Priyanka Dutta Saha, Coordinator, ISR committee and Mrs Sunita Sasane, member ISR committee were present during the session.

Dr. Shubhangi S. Puranik, felicitated all the guests and started the program with a short introduction. Mr. B.S. Raghavendra guided the students with motivating and inspiring words. He emphasized the students to acquire different skills apart from education to achieve their goal in life. The students were very happy and gave a positive feedback. The program ended with the vote of thanks which was proposed by Dr. Priyanka Dutta Saha.





# Institutional Social Responsibility (ISR) Activity


















# Institutional Social Responsibility (ISR) Activity







# *Events Conducted by National Service Scheme (NSS) in August 2025*

# Street play at Swargate Metro Station on 15th August 2025








# Street play at Swargate Metro Station on 15th August 2025






# Tree plantation at Kule Paud on 24th August 2025

Total plantation 34
Bamboo tree:20
Son chafa: 14
Staff participated : Dr Prabhakar Varade, Prof. Ankit Bhardwaj, Prof Sanika Surwase, Prof. Harsahli More and 28 NSS volunteers.









# Library Visit Hour of TYBA Marathi Students on 4.8.2025

तृतीय वर्ष कला शाखा मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांची ग्रंथालयाला भेट

Dt. 4.8.2025







# Events Conducted by the Library during August 2025

## *1. Sahityaratna Annabhau Sathe Jayanti: 1st August 2025*

On 01st August 2025, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated the Birth Anniversary of 'Sahityaratna Annabhau Sathe' as per the instructions in Government of Maharashtra's GR under the guidance of Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir.

Principal Sir mentioned that Annabhau Sathe who was born as Tukaram Bhaurao Sathe, was a social reformer, folk poet, and writer from Maharashtra, India. Annabhau Sathe's use of folkloric narrative styles like powada (पोवाडा) and lavani(लावणी) helped popularise and make his work accessible to many communities. He wrote several novels in Marathi language.

I am thankful to the teaching, non-teaching staff members and library staff members who were present during the programme.

**Regards,**
**Dr. Shantashree Sengupta,**
**Librarian.**








# Events Conducted by the Library during August 2025

**साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे**

( दि.१ ऑगस्ट, १९२० - १८ जुलै, १९६९)

(अल्प परिचय)

कथा, कादंवरी, लोकनाट्य, नाटक, पटकथा, लावणी, पोवाडे, प्रवास वर्णन अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारांतील लेखन केलेले ख्यातनाम मराठी साहित्यिक. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म वाटेगाव (ता. वाळवा जि. सांगली) येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिधोजी तर आईचे नाव वालवाई होते. त्यांचे मूळ नाव तुकाराम. अण्णाभाऊंचे शालेय शिक्षण झालेले नव्हते तथापि त्यांनी प्रयत्नपूर्वक अक्षरज्ञान मिळविले.

सन १९३२ साली ते वडिलांसोवत मुंवईला आले. चरितार्थासाठी कोळसे वेचणे, मुंवईच्या मोरवाग गिरणीत झाडूवाला म्हणून नोकरी, अशी मिळतील ती कामे त्यांनी केली. मुंवईतील कामगारांचे कष्टमय, दुःखी जीवन त्यांनी पाहिले. त्यांचे संप, मोर्चे पाहून त्यांचा लढाऊपणाही त्यांनी अनुभवला. अमर शेख या ख्यातनाम मराठी लोकशाहीरांबरोबर अण्णाभाऊंचेही नाव लोकशाहीर म्हणून गाजू लागले. अण्णाभाऊंनी सन १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने "लाल बावटा" कलापथक स्थापन केले. या कलापथकावर इंग्रज सरकारने बंदी घातली.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिले होते. त्यांच्या लेखनात लावणी, पोवाडे, गीते, लोकनाटये आदींचा समावेश होता. अण्णाभाऊंच्या साहित्यात त्यांची कथा-कादंवरीची निर्मितीही ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतूस, आवी, खुळवाडी, वरवाद्याकंजारी (१९६०), चिरानगरची भुतं (१९७८), कृष्णाकाठच्या कथा हे त्यांचे काही कथासंग्रह. त्यांनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा (१९४५) ही त्यांची पहिली कादंबरी. नंतर फकिरा (१९५९), वारणेचा वाघ (१९६८), चिखलातील कमळ, रानगंगा, माकडीचा माळ (१९६३), वैजयंता यांसारख्या प्रसिध्द कादंबऱ्या त्यांनी लिहील्या. त्यांच्या "फकिरा" या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले आहेत. वैजयंता (१९६१ कादंवरी वैजयंता), टिळा लावते मी रक्ताचा (१९६९, कादंवरी आवडी), डोंगरची मैना (१९६९, कादंवरी माकडीचा माळ) मुरली मल्हारीरायाची (१९६९, कादंवरी चिखलातील कमळ), वारणेचा वाघ (१९७० कादंवरी वारणेचा वाघ), अशी ही साताऱ्याची तऱ्हा (१९७४, कादंवरी अलगूज), फकिरा (कादंवरी फकिरा). या शिवाय इनामदार, पेंग्याचं लगीन, सुलतान ही नाटकेही त्यांनी लिहिली.

उपेक्षित, गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले, दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहात आले. डॉ. वावासाहेव आंवेडकर यांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. "जग बदल घालुनी घाव। सांगूनि गेले मज भीमराव॥" हे त्यांचे गीत खूप गाजले. त्यांनी लिहिलेल्या लावण्यांत "माझी मैना गावावर राहिली" आणि "मुंवईची लावणी" या अजोड आणि अविस्मरणीय आहेत. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन दलित लेखकांची एक प्रतिभावान पिढी निर्माण झाली. त्यात बाबूराव बागूल, नामदेव ढसाळ, लक्ष्मण माने, यशवंत मनोहर, दया पवार, केशव मेश्राम, शरणकुमार लिंवाळे आदींचा अंतर्भाव होतो.

रशियाच्या "इंडो-सोव्हिएत कल्चरल सोसायटी" च्या निमंत्रणावरून ते १९६१ साली रशियाला गेले. तेथील अनुभवांवर आधारित "माझा रशियाचा प्रवास" हे प्रवास वर्णन त्यांनी लिहिले.

महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णाभाऊंवर अकरा प्रवंध सिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ "अण्णाभाऊ साठे अध्यासन" सुरु करण्यात आले आहे. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांची केवळ भारतीयच नव्हे, तर २२ परकीय भाषांत भाषांतरे झाली आहेत.

*****

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)








# Events Conducted by the Library during August 2025









# Events Conducted by the Library during August 2025









# Events Conducted by the Library during August 2025

## *2. Krantisinh Nana Patil Jayanti: 3rd August 2025*

On 03rd August 2025, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated the Birth Anniversary of Krantisinh Nana Patil (क्रांतिसिंह नाना पाटील) as per the instructions in Government of Maharashtra's GR under the guidance of Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir.

Principal Sir mentioned that Nana Patil, who was popularly known as क्रांतिसिंह (meaning 'Revolutionary Lion'), was an Indian freedom fighter and Member of Parliament representing Beed District of Marathwada region. He was a source of inspiration for the people. In the British Era, Krantisinh Nana Patil established a parallel government in the district of Satara.

Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir, Librarian Dr. Shantashree Sengupta and Library Staff paid their respect to Krantisinh Nana Patil.

I am thankful to all who were present during the programme.

**Regards,**
**Dr. Shantashree Sengupta,**
**Librarian.**

**क्रांतिसिंह नाना पाटील**

(दि. ३ ऑगस्ट, १९०० - ६ डिसेंबर, १९७६)

(अल्प परिचय)

एकबोटे जिल्हास्तरीय आंतरशालेय संस्कृत पाठांतर स्पर्धा २०२५-२६ चे उद्घाटन आणि गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे, मिलिंद एकबोटे, सहकार्यवाह प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे उपस्थित होते.

Hello Pune
Page No. 3 Aug 06, 2025
Powered by: erelego.com

प्रभात

## संस्कृत भारताच्या बौद्धिक संपदेचे मूळ

### पुणे विद्यापीठाचे डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी मांडले विचार

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. ५ -** संस्कृत ही केवळ कर्मकांडाची भाषा नाही, तर भारताच्या बौद्धिक संपदेचे मूळ आहे. पाश्चिमात्य देशही आज संस्कृतचे महत्त्व पटवून देत आहेत. विद्यार्थ्यांनी संस्कृतसारख्या प्रगल्भ भाषेचा गाभा आत्मसात करावा, असे विचार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी मांडले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न हायस्कूलतर्फे आयोजित दादासाहेब एकबोटे जिल्हास्तरीय आंतरशालेय संस्कृत पाठांतर स्पर्धेचे उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. स्पर्धेचे हे दहावे वर्ष असून, मागील वर्षी तीन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. संस्थेचे सचिव शामकांत देशमुख, तसेच मिलिंद एकबोटे, डॉ. नंदकिशोर एकबोटे, चित्तरंजन कांबळे, उद्धव खरे, मुख्याध्यापिका सीमा कुळधरण, उपमुख्याध्यापिका वंदना सोनवणे, पर्यवेक्षिका वर्षा पाचारणे, पर्यवेक्षक प्रमोद शिंदे उपस्थित होते. मिलिंद एकबोटे यांनीही संस्कृतचा सर्व शाळांमध्ये अभ्यास असावा, असे नमूद केले. सूत्रसंचालन सतीश लिबेंकर यांनी केले. आभार संस्कृत शिक्षिका रूपाली जोशी यांनी केले.

Pune City Edition
Aug 06, 2025 Page No. 15
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

नवराष्ट्र
www.navarashtra.com

**उपक्रम ● प्रा. डॉ. आदित्य अभ्यंकर यांचे मार्गदर्शन; आंतरशालेय संस्कृत पाठांतर स्पर्धा**

## विद्यार्थ्यांत संस्कृतप्रेम जागवणारी स्पर्धा

**पुणे, शहर प्रतिनिधी.** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी आणि मॉडर्न हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दादासाहेब एकबोटे जिल्हास्तरीय आंतरशालेय संस्कृत पाठांतर स्पर्धा २०२५–२६ चा उद्घाटन समारंभ आणि गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.या वेळी प्रमुख पाहुणे उपस्थित असलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेचा गाभा आत्मसात करण्याचे आवाहन केले.



### संस्कृत भाषा शाळेत अनिवार्य पाहिजे

"संस्कृत ही केवळ भाषा नसून भारतीय संस्कृतीची मुळे तिच्यात दडलेली आहेत. पठणासोबत अर्थ समजून घेतला तर त्याचा खरा आनंद मिळतो," असे ते म्हणाले.प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांनी संस्कृत भाषा स्मरणशक्ती आणि उच्चार शुद्धतेच्या विकासासाठी उपयुक्त असल्याचे सांगितले. संस्कृतीप्रेम व मूल्यनिष्ठा वाढवण्यावर त्यांनी भर दिला.मिलिंदभाऊ एकबोटे यांनी "संस्कृत भाषा ही प्रत्येक शाळेत अनिवार्य असावी.

Pune Plus Edition
Aug 06, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

लोकमत

## 'संस्कृतपठणात अर्थ समजून घेणेच खऱ्या ज्ञानाची प्राप्ती'

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यार्थ्यांनी पाठांतर करताना अर्थ जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अर्थ माहिती नसेल, तर अर्थाचे अनर्थ होतात. पठणामागील अर्थ समजून घेतल्यास खऱ्या आनंद आणि ज्ञानाची खरी प्राप्ती होते, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी व्यक्त केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी आणि मॉडर्न हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. ४) दादासाहेब एकबोटे जिल्हास्तरीय आंतरशालेय संस्कृत पाठांतर स्पर्धा २०२५-२६ चे उद्घाटन आणि गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे, मिलिंद एकबोटे, सहकार्यवाह प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, डॉ. नंदकिशोर एकबोटे, शाळा समिती अध्यक्ष चित्तरंजन कांबळे, व्हिजिटर उद्धव खरे, पर्यवेक्षिका वर्षा पाचारणे, संस्था पर्यवेक्षक प्रमोद शिंदे, सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे सिनेट सदस्य दादाभाऊ शिनलकर, गणपत नांगरे आदी उपस्थित होते.

Hello Pune
Page No. 5 Aug 07, 2025
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*



# माती गणपती ट्रस्टतर्फे जिवंत देखावा सादर

**पुणे :** नारायण पेठ माती गणपती मंडळ ट्रस्टच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवात 'गोंद्या आला रे आला' हा सजीव देखावा सादर करण्यात येत आहे. देखाव्याचे उद्घाटन डॉ. रोहित टिळक यांच्या हस्ते झाले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. निवेदिता एकबोटे, परेश हराळे, विशाल नांगरे, महेश हराळे, शुभम आदवडे, निखिल देशपांडे आदी उपस्थित होते. मारवा क्रिएशन यांनी देखाव्याची निर्मिती केली असून, लेखन दिग्दर्शन राहुल गाजरे, प्रज्ञा दंडवते यांचे आहे.

Sakal 30.8.2025

# News Paper Clippings During August 2025

## Section: Education

# 'UPLOAD DATA ON MAHA'DBT PORTAL FOR SCHOLARSHIP'

**Kimaya Boralkar**

puneletters@hindustantimes.com

**PUNE:** Colleges and universities across Maharashtra have been directed to update their institutional and course related information on the MahaDBT portal to ensure proper implementation of government scholarship schemes for the academic year 2025-26.

Director of Higher Education, Shailendra Deolankar, issued instructions on July 30 to all higher educational institutions to upload accurate data regarding course fees, as per the fee structure approved by the State Government and respective universities. Supporting documents related to fee approvals must also be uploaded on the MahaDBT portal.

The Maharashtra government provides various scholarship schemes through the MahaDBT platform, including 14 schemes under the Directorate of Higher Education. In order for students to apply for scholarships, it is mandatory that the concerned college or university account on the portal is up to date. Institutions are required to provide details such as college name, address, names and contact numbers of the clerk and principal, and list of courses offered.

Hindustan Times 1.8.2025

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

प्रभात

# अकरावीसाठी आता ओपन टू ऑल फेरी

## ४ ते ६ ऑगस्टदरम्यान प्रक्रिया; ६ ऑगस्टला गुणवत्ता यादी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३ -** केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत इयत्ता अकरावी प्रवेशासाठी चार नियमित प्रवेश फेऱ्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यानंतर आता सर्वांसाठी खुली प्रवेश फेरी (ओपन टू ऑल) घेण्यात येणार आहे. या फेरीचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले आहे. या फेरीची ४ ते ६ ऑगस्ट या कालावधीत प्रक्रिया राबविण्यात येणार असून, ६ ऑगस्टला गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे.

राज्यात एकूण चौथ्या फेरीअखेर ९ हजार ५२२ कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी झाली असून, यात एकूण प्रवेश क्षमता २१ लाख ५० हजार ४७९ दर्शविण्यात आली.




चौथ्या फेरीअखेरपर्यंत १४ लाख ३८ हजार ४८९ विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर नोंदणी केली. एकूण चार फेऱ्या पूर्ण झाल्या असून, एकूण ८ लाख ८२ हजार ८१ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले. अद्यापही प्रवेशासाठी १२ लाख ६८ हजार ३९८ रिक्त जागा आहेत.

ओपन टू ऑल या फेरीमध्ये अर्ज करण्यास ४ ऑगस्टला सकाळी ८ वाजल्यापासून ते ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० पर्यंत मुदत आहे. आतापर्यंत झालेल्या चार फेऱ्यांमध्ये प्रवेश न मिळालेले विद्यार्थी या प्रवेश फेरीमध्ये त्यांच्या अर्जाचा भाग एक व भाग दोन यामध्ये आवश्यकतेनुसार बदल व दुरुस्ती करू शकणार आहेत. नव्याने नोंदणीची सुविधाही उपलब्ध असणार आहे. जुलै २०२५ च्या इयत्ता दहावीच्या पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या प्रवेश फेरीमध्ये त्यांची नोंदणी करून प्राधान्यक्रम नोंदवू शकणार आहेत.

ओपन टू ऑल या फेरीची गुणवत्ता यादी व विद्यार्थ्यांच्या प्राधान्यक्रमानुसार कॉलेज अलॉटमेंटची यादी ६ऑगस्टला सकाळी दहा वाजता प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली आहे.

Pune City Edition
Aug 04, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

पुढारी

# नव्या नॅक मूल्यांकनाला सामोरे जा!

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे १९५ महाविद्यालयांना निर्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना विद्यापीठ प्रशासनाने वारंवार नॅक मूल्यांकन करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, अनेक महाविद्यालये याकडे कानाडोळा करत आहेत. त्यामुळे विद्यापीठाने आता ११५ महाविद्यालयांना नव्या नॅक मूल्यांकन प्रक्रियेला सामोरे जाण्याचे निर्देश दिले आहेत.

विद्यापीठाच्या संलग्नता कक्षाच्या उपकुलसचिवांनी दिलेल्या निर्देशानुसार, विद्यापीठ संलग्न ज्या महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थांना ५ वर्षे पूर्ण झालेली आहेत तसेच ज्या महाविद्यालये, परिसंस्थांना ५ वर्षांपेक्षा अधिक कालावधी होऊनदेखील अद्याप एकदाही त्यांनी नॅक मूल्यांकन केलेले नाही, अशा महाविद्यालये, परिसंस्थांनी बायनरी मूल्यांकन लवकरच सुरू होणार असल्याने त्यासाठी प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन आता ऑनलाइनदेखील होणार आहे. ऑनलाइन नॅक मूल्यांकनामुळे मोठ्या प्रमाणात वेळेची बचत होणार आहे. त्याचबरोबर प्रक्रियेत पारदर्शकता येणार असून, आर्थिक बचतदेखील होणार आहे. कर्नाटकच्या गुंटूरमधील एका विद्यापीठाला 'ए' ग्रेड देण्यासाठी नॅकच्या काही मूल्यांकनकर्त्यांनी संबंधितांकडून लाच घेतली होती. या प्रकरणानंतर नॅकला टीकेला सामोरे जावे लागले. या पार्श्वभूमीवर मूल्यांकन प्रक्रिया सुधारण्यासाठी नॅकने महाविद्यालयांची प्रत्यक्ष तपासणी थांबवली होती. याला तब्बल एक वर्षाचा कालावधी झाला आहे. आता ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करण्याचा निर्णय घेतला आहे.

नॅक मूल्यांकन ऑनलाइन करण्यासाठी विद्यापीठांसाठी एक संकरित प्रणाली तयार करण्यात आली आहे. ज्यामध्ये बहुतेक मूल्यांकन ऑनलाइन पद्धतीने केले जाईल. परंतु काही पुनरावलोकनकर्ते साइटवर तपासणीदेखील करतील. या नवीन धोरणांतर्गत मूल्यांकनकर्त्यांची जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. ऑनलाइन प्रणाली लागू झाल्यामुळे महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या मूल्यांकन प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येईल.

> ज्या महाविद्यालयांना ५ वर्षे पूर्ण झालेली आहेत तसेच ज्या महाविद्यालये, परिसंस्थांना ५ वर्षांपेक्षा अधिक कालावधी होऊनदेखील अद्याप एकदाही त्यांनी नॅक मूल्यांकन केलेले नाही अशा महाविद्यालयांनी येत्या तीन महिन्यांमध्ये नव्याने होणाऱ्या बायनरी नॅक मूल्यांकनाला सामोरे जावे, यासाठी विद्यापीठामार्फत संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे. तसेच त्यांची जागृती करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन आग्रही आहे.
>
> **- डॉ. पराग काळकर,** प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

Pune Edition
Aug 04, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

पुढारी

# अकरावी प्रवेशासाठी अद्यापही १२ लाखांवर जागा रिक्तच

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात अकरावी प्रवेशाच्या तब्बल चार फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. या चार फेऱ्यांमध्ये कॅप आणि कोटा मिळून एकूण ८ लाख ८२ हजार ८१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. आता पुढील प्रवेश प्रक्रिया ओपन टू ऑल फेरीद्वारे राबविण्यात येणार आहे. दरम्यान, अकरावी प्रवेशासाठी राज्यात अद्यापही अकरावीच्या १२ लाख ६८ हजार ४९ जागा रिक्तच असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अकरावी प्रवेशासाठी राज्यात ९ हजार ५२५ महाविद्यालयांमध्ये १८ लाख ७ हजार ४४६ जागा कॅप प्रवेशाच्या तसेच ३ लाख ४२ हजार ६८४ जागा कोटा प्रवेशाच्या अशा एकूण २१ लाख ५० हजार १३० जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी १४ लाख ३८ हजार ८९४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी ७ लाख २६ हजार ११९ विद्यार्थ्यांनी कॅपद्वारे तसेच १ लाख ५५ हजार ९६२ विद्यार्थ्यांनी विविध कोटाअंतर्गत अशा एकूण ८ लाख ८२ हजार ८१ विद्यार्थ्यांनी आतापर्यंत प्रवेश घेतला आहे. आता प्रवेशासाठी कॅप प्रवेशाच्या १० लाख ८१ हजार ३२७ आणि कोटा प्रवेशाच्या १ लाख ८६ हजार ७२२ अशा एकूण १२ लाख ६८ हजार ४९ जागा उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाले आहे.

- **ओपन टू ऑल फेरीद्वारे होणार प्रवेशप्रक्रिया**

आता ओपन टू ऑल फेरीसाठीचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार असून, त्यानुसार पुढील प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition

Aug 04, 2025 Page No. 03

Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

प्रभात
www.dainikprabhat.com

# नॅक मूल्यांकनाकडे दुर्लक्ष

## पुणे विद्यापीठाची ११६ महाविद्यालयांना तंबी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ४** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अनेक महाविद्यालयांकडून राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेच्या (नॅक) मूल्यांकनाकडे सातत्याने होणाऱ्या दुर्लक्षाची विद्यापीठ प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. वारंवार सूचना देऊनही प्रतिसाद न देणाऱ्या तब्बल ११६ महाविद्यालयांना आता नव्याने होणाऱ्या बायनरी नॅक मूल्यांकन प्रक्रियेला सामोरे जाण्याचे सक्त निर्देश विद्यापीठाने दिले आहेत.

विद्यापीठाशी संलग्न होऊन पाच वर्षे पूर्ण झालेली किंवा त्याहून अधिक काळ लोटूनही अद्याप एकदाही नॅक मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांना येत्या तीन महिन्यांत प्रस्ताव सादर करण्यास सांगण्यात आले आहे. यासंदर्भात विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयांना कळवले आहे. दरम्यान, नॅक मूल्यांकन प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणणे, वेळेची आणि पैशांची बचत करणे, या उद्देशाने महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. यापुढे बहुतांश मूल्यांकन प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवली जाणार आहे. त्यामुळे मूल्यांकनकर्त्यांची जबाबदारी निश्चित होऊन भ्रष्टाचाराला आळा बसेल आणि संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता येईल. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या संलग्नता कक्षाने प्रसिद्ध केले असून, आता ११६ महाविद्यालयांना तातडीने नॅकची प्रक्रिया सुरू करावी लागणार आहे. नॅककडे दुर्लक्ष करणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाईचा बडगा उगारला जाणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune City Edition
Aug 05, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2025*

## *Section: Education*



City | Pune Times Mirror | Sunday, August 10, 2025 | 5

# Colleges told to get NAAC nod

## SPPU vice-chancellor issues an order asking 116 institutions to start the binary evaluation process

| Pratiksha Parkhi
feedback@punemirror.com
@ThePuneMirror

Since 116 colleges affiliated with Savitribai Phule Pune University (SPPU) have not yet undergone evaluation by the National Assessment and Accreditation Council (NAAC), the university administration has ordered them to implement the binary evaluation process. These colleges, spread across various districts, must soon submit proposals to complete the NAAC evaluation process.

The list announced by the university mainly includes colleges from Pune, Ahmednagar, and Nashik districts, which have not been evaluated by NAAC, even though more than five years have passed since their establishment.

The university has directed these institutions to start the binary evaluation process and will provide them with the necessary guidance.

Completing the NAAC evaluation is mandatory, and the university administration has issued notices to these colleges.

A circular has also been published in this regard. Considering the importance of the NAAC evaluation, university officials will guide colleges on parameters such as academic quality, administrative functioning, research activities, and other qualitative criteria.

NAAC accreditation is essential for colleges affiliated with SPPU, and the Higher Education Department has issued repeated instructions in this regard. However, many institutions have not yet started the process. For such colleges, the binary evaluation process will now be implemented, enabling more effective handling of changes and challenges in the NAAC process.

### Importance of NAAC accreditation

NAAC has established a crucial framework for assessing the quality of higher education institutions in India. Its evaluation covers academic standards, administration, research, student services, and the overall functioning of the institution. Based on this evaluation, institutions are awarded grades such as A++, A+, A, B, C, etc., which reflect their quality standards.

### Changes in NAAC evaluation process

Recently, NAAC has introduced changes in its assessment procedure, including the launch of binary evaluation. This method examines parameters such as academic quality, research initiatives, student progress, and other important benchmarks, with a primary focus on the institution's academic mission, teaching quality, and student support.

Typically, institutions are required to prepare a self-assessment report for evaluation, which reviews their academic processes. The updated NAAC process aims to make institutions stronger in multiple dimensions. Once colleges complete the binary evaluation, NAAC grading will enhance their credibility.

### Quality improvement and challenges for colleges

The main aim of the NAAC evaluation process is to improve academic standards. However, in many colleges, only exam results are prioritised, while infrastructure, administrative systems, teacher quality, and research activities are overlooked.

Some colleges lack physical facilities or other resources needed to meet the criteria. Such institutions must collaborate with the government, the university, and other agencies for guidance and financial support — especially small, resource-limited colleges. For this, the Higher Education Department has also launched the Parisar Sparsh initiative.

**Typically, institutions are required to prepare a self-assessment report for evaluation, which reviews their academic processes**

### Role of government and university

Colleges need help to pass the NAAC evaluation. The state government and universities must jointly prepare phased improvement plans. Directives alone are insufficient; institutions must receive genuine guidance and financial support.

To raise awareness about NAAC's complexity and necessity, workshops, training sessions, and interactive programs should be organised. This will improve institutional quality and increase trust among students.

THE SPPU has ordered all 116 non-accredited colleges to complete the NAAC evaluation through the binary process. NAAC accreditation, a key driver of quality improvement in higher education, is now being made more effective through this updated system. Colleges will be guided on academic, administrative, and other parameters, boosting their quality enhancement journey. The joint efforts of the government, university, and colleges can help higher education institutions achieve globally competitive standards.

Pune Mirror 10.8.2025

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

# शिष्यवृत्तीची रक्कम वजा करून शुल्क घ्या!

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे व्यावसायिक अभ्यासक्रम महाविद्यालयांना निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पूर्ण शुल्क आकारण्याबाबत राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना लगाम लावला आहे. या संदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट सूचना दिल्या असून, लाभासाठी पात्र विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणारी शिष्यवृत्ती विचारात घेऊन शिष्यवृत्तीची रक्कम वजा करून उर्वरित शुल्काची रक्कमच विद्यार्थ्यांकडून आकारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### नियम मोडणाऱ्या संस्थांवर कारवाईचा इशारा

शुल्क नियामक प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा अधिक रकमेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, रोख किंवा वस्तूच्या स्वरूपात मागणी केल्यास त्याचा अर्थ नफेखोरी असा होतो. त्यामुळे या नियमांचे काटेकोरपणे पालन न करणाऱ्या संस्थांवर प्रवेश शुल्क अधिनियम कलम २० मधील तरतुदीनुसार कारवाई करण्याचा इशाराही परिपत्रकाद्वारे देण्यात आला आहे.



### विद्यार्थ्यांना तक्रार करण्यासाठी सुविधा

शासनाच्या योजनेच्या लाभासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्काची मागणी केली जात असल्यास त्याबाबत विद्यार्थ्यांना शासन, संचालनालयाकडे तक्रार करायची असल्यास राज्य सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर दूरध्वनी क्रमांक, मदतकक्ष दुवा उपलब्ध करून त्याबाबत सीईटी सेलद्वारे कळवण्यात येईल.

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेल्या विविध अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालयांतील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश तंत्रशिक्षण संचालनालय, राज्य समायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल) यांच्याकडून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे निश्चित केले जातात. प्रवेश घेत असताना संस्था महाविद्यालये, शुल्क नियामक प्राधिकरण, शुल्क निश्चिती समितीकडून निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्काची मागणी करत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त होतात. या प्रवेश प्रक्रियेदरम्यान प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना शुल्क आकारणीबाबत अडचणी येऊ नयेत, संस्थांकडून महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतुदींचे उल्लंघन होऊ नये, या दृष्टीने सूचना देण्यात आल्याचे परिपत्रकात नमूद केले आहे.

संस्थेतील सर्व अभ्यासक्रमांच्या प्रत्येक वर्षासाठी शुल्क नियामक प्राधिकरण, शुल्क निश्चिती समिती यांनी निर्धारित केलेले अभ्यासक्रमनिहाय शुल्क विद्यार्थी, पालकांच्या निदर्शनास येईल, अशा पद्धतीने मराठी आणि इंग्रजीमध्ये संकेतस्थळावर, सूचना फलकावर प्रदर्शित करणे अनिवार्य आहे, असे परिपत्रकात म्हटले आहे.

Loksatta 12.8.2025

# *News Paper Clippings During August 2025*

## *Section: Education*

पुढारी

# अकरावी प्रवेशासाठी आता विशेष फेरी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतून अद्याप महाविद्यालय न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी आता प्रवेशासाठी विशेष फेरी राबवली जाणार आहे. मंगळवार, दि.१२ ते २० ऑगस्टदरम्यान संबंधित फेरी राबविण्यात येणार आहे. राज्यात अकरावी प्रवेशाच्या चार नियमित फेऱ्या तसेच एक सर्वांसाठी खुला प्रवेश फेरी राबविण्यात आली आहे. दरम्यान, आत्तापर्यंत तब्बल १२ लाखांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, प्रवेशासाठी अद्यापही साडेनऊ लाखांच्या जवळपास जागा रिक्तच राहिल्या असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्यातील अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत सर्वांसाठी खुला प्रवेश या फेरीत ३ लाख ४८ हजार ८७४ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे. प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना मुदतवाढीसह ११ ऑगस्टपर्यंत महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करण्याची संधी देण्यात आली होती. त्यानंतर आता विद्यार्थ्यांसाठी आता विशेष फेरी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## १९ ऑगस्टला होणार प्रवेश जाहीर

### असे आहे विशेष फेरीचे वेळापत्रक

- **१२ ते १३ ऑगस्ट** - नवीन विद्यार्थी नोंदणी अर्जाचा भाग एक दुरुस्ती करणे, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या इच्छेनुसार (व्यवस्थापन, अल्पसंख्याक) कोट्यातील जागा प्रत्यार्पित करणे.
- **१४ ऑगस्ट** - विशेष फेरीसाठी पोर्टलवर रिक्त जागा प्रदर्शित करणे.
- **१५ ते १७ ऑगस्ट** - विशेष फेरीअंतर्गत विद्यार्थ्यांना नवीन नोंदणी करणे, भरलेल्या अर्जात दुरुस्ती करणे, राज्य मंडळाच्या पुरवणी परीक्षेत एटीकेटीच्या विद्यार्थ्यांसाठी नोंदणी आणि पसंतीक्रम भरणे.
- **१९ ऑगस्ट** - विशेष फेरीसाठी प्रवेश जाहीर करणे
- **१९ ते २० ऑगस्ट** - विशेष फेरीमध्ये अलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी मुदत देण्यात येणार आहे.

अकरावी प्रवेशासाठी राज्यात ९ हजार ५२५ महाविद्यालयांमध्ये १८ लाख ७ हजार ४४६ जागा कॅप प्रवेशाच्या तसेच ३ लाख ४२ हजार ६८४ जागा कोटा प्रवेशाच्या अशा एकूण २१ लाख ५० हजार १३० जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी १४ लाख ५७ हजार ३०९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी एकूण १० लाख ४२ हजार ७०९ विद्यार्थ्यांनी कॅपमधून, तर १ लाख ६० हजार ७३३ विद्यार्थ्यांनी कोटाअंतर्गत अशा १२ लाख ३ हजार ४४२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. आता प्रवेशासाठी अद्यापही ७ लाख ६४ हजार ७३७ जागा कॅप प्रवेशाच्या तसेच १ लाख ८१ हजार ९५१ जागा कोटा प्रवेशाच्या अशा एकूण ९ लाख ४६ हजार ६८८ जागा प्रवेशासाठी उपलब्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.




Pune Edition
Aug 13, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

प्रभात

# फेऱ्यांमागून फेऱ्या तरी जागा मोकळ्या

## अकरावीसाठी ओपन टू ऑल फेरीनंतर आता विशेष फेरीचे आयोजन

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२** - अकरावी ऑनलाइन प्रवेशासाठी तब्बल पाच फेऱ्या पुर्ण झाल्या आहेत. अद्याप, राज्यातील ९ लाख ४६ हजार जागा रिक्त आहेत. नेहमीच्या फेऱ्यांनंतर ओपन टू ऑल फेरी झाल्यावर आता मोकळ्या जागांसाठी विशेष फेरी सुरु करण्याची वेळ आली आहे. आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी आयटीआय, पॉलिटेक्निक व अन्य डीप्लोमाला प्रवेश घेतल्याने अकरावीच्या जागा मोठ्या प्रमाणावर मोकळ्या राहिल्या आहेत

राज्य मंडळाने घेतलेल्या दहावी परीक्षेचा निकाल १३ मे रोजी जाहीर झाला. त्यात १४ लाख ५५ हजार ४७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. पुरवणी परीक्षा आणि एटीकेटी सुविधेमुळे राज्यात एकुण १४ लाख ८२ हजार ५७५ विद्यार्थी अकरावी प्रवेशासाठी पात्र आहेत.

राज्यात एकूण ९ हजार ५२५ कनिष्ठ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता २१ लाख ५० हजार ३१० एवढी आहे. प्रवेशासाठी १४ लाख ५५ हजार ९४५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून १२ लाख ३ हजार ४१६ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेतले आहेत. प्रवेशासाठी नोंदणी केलेल्यापैंकी २ लाख ५२ हजार ५२९ विद्यार्थ्यांनी अद्याप अकरावीला प्रवेश घेतलेला नाहीत. त्यांनी अन्यत्र प्रवेश घेतल्याने कितीही प्रवेश फेऱ्या घेतल्या तरी अकरावीच्या जागा मोकळ्याच राहणार आहेत.

### अकरावी वर्गास विलंब

यंदा अकरावीसाठी राज्यात ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविली. यात सुरुवातीला तांत्रिक अडथळे आल्याने त्याला विलंब झाला. ग्रामीण भागात ऑनलाइन पद्धतीला विरोध झाला. दहावीचा निकाल लागून तीन महिने झाले तरी अद्यापही अकरावीच्या प्रवेश फेऱ्याचे चक्र सुरुच आहे. त्यामुळे अकरावीचे वर्ग सुरु करण्यासही विलंब होत आहे. अद्याप अकरावीच्या बहुसंख्य जागा शिल्लक आहेत. त्यामुळेच शिक्षण संचालनालयाने विशेष फेरीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. १३ ते २० ऑगस्टमध्ये ही फेरी पूर्ण केली जाणार आहे.

Pune City Edition
Aug 13, 2025 Page No. 13
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

# Fees: Relief for students

## Colleges ordered to collect fees after deducting the scholarship amount

| Pratiksha Parkhi
feedback@punemirror.com
@ThePuneMirror

The Higher and Technical Education Department (HTED) has decided to put an end to the practice of professional colleges in the state collecting full fees from students eligible for scholarships. According to the latest circular issued in this regard, colleges must not demand full fees from such students. Instead, they are instructed to collect only the remaining amount after deducting the scholarship portion.

This decision has come as a major relief for students. Every year, during the admission process, complaints were received that many colleges charged students full fees despite their eligibility for scholarships. This forced students to bear a heavy financial burden, leaving many students and parents in difficulty. With the new government directive, it is expected that such complaints will now be curbed.

### Clear instructions from government

The circular states that while admitting scholarship beneficiaries, colleges must charge only the net fees after deducting the scholarship amount. Any violation of this directive will result in action against the institutions.

The purpose of this circular is to ensure that students do not face financial fraud or inconvenience during the admission process. It also


FILE PHOTO

aims to enforce strict compliance with the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015.

### Fee info mandatory in Marathi and English

Each institution is required to display course-wise fee details both on its website and on notice boards in Marathi and English. This condition has been imposed to ensure that the information remains transparent and easily understandable for students.

### Excess fees to be treated as 'profiteering'

The circular makes it clear that demanding fees higher than those approved by the Fee Regulatory Authority—whether directly, indirectly, in cash, or by any other means—will be considered profiteering. Institutions violating these rules will face strict action under Section 20 of the 2015 Admissions and Fees Act.

### Facility for students to file complaints

If any institution demands extra fees despite a student being eligible for a scholarship, students have the right to lodge a complaint. For this purpose, a helpline number and grievance redressal link will be provided on the State CET Cell's official website. Once a complaint is received, appropriate action will be taken against the concerned institution.

### Responsibility of colleges

The government has directed all aided and unaided colleges in the state to take this circular seriously and strictly comply with the rules. Institutions are reminded that maintaining transparency in fees is not only a legal obligation but also a social responsibility.

### Likely outcomes of government's decision

- Reduction in financial burden on students
- Increased transparency in the admission process
- Clear accountability for educational institutions
- Action possible against errant colleges
- Education accessible on the basis of merit

This decision is expected to provide significant relief to thousands of students across the state and is a crucial step toward ensuring transparency and fairness in the education system. Students too are urged to know their rights, stay alert against any demand for excess fees, and lodge complaints when necessary. Education is a service, and unjust profiteering cannot be tolerated—this is the guiding principle behind the government's move.

Pune Mirror 17.8.2025

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

# SPPU third in India!

## Varsity scores in Outlook-ICARE Rankings 2025

| Pratiksha Parkhi
feedback@punemirror.com
@ThePuneMirror



Carrying forward Maharashtra's rich educational legacy, the Savitribai Phule Pune University (SPPU) has added yet another feather to its cap. In the Outlook-ICARE Rankings 2025, under the category of 'State Public Universities of India,' the SPPU has secured the third position in the country. The university achieved this distinction by maintaining academic standards, research excellence, robust infrastructure, and industry-friendly policies.

In this prestigious ranking, Jadavpur University (West Bengal) claimed the first position, while University of Calcutta ranked second. Pune University trailed behind them by only a few points, scoring 928.43 out of 1,000, compared to Calcutta University's 928.49 and Jadavpur University's 929.7.

### Ranking of state universities

The Outlook-ICARE Rankings 2025, announced on August 1, 2025, included 75 of India's best state public universities. Maharashtra's positions were:

- University of Mumbai: 26
- Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University (Aurangabad): 28
- Shivaji University (Kolhapur): 40
- North Maharashtra University (Jalgaon): 46
- Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University: 52
- Gondwana University (Gadchiroli): 75

Against this backdrop, SPPU's 3rd position is a matter of immense pride for the state.

### University leadership's reactions

SPPU Vice-Chancellor Dr. Suresh Gosavi expressed his pride, "Being recognised as the third-best state public university in India in the Outlook-ICARE Rankings 2025 is a matter of great honour for us. This achievement reflects the collective hard work of our faculty, aspiring students, and dedicated staff. We will continue to carry forward the legacy of SPPU as a beacon of education and research, reaching new heights of success."

Pro-Vice-Chancellor Dr. Parag Kalkar also credited the entire university community, "The 3rd rank is remarkable. It reflects the dedication of our faculty, the innovative spirit of our researchers, and the tireless work of every member of the SPPU family. We are committed to further improving academic programmes, strengthening industry ties, and providing our students with a world-class learning environment."

### SPPU's performance

The rankings are based on several important parameters, including academic quality, research, industry partnerships, placements, infrastructure, and student environment. The SPPU scored as follows:

- Academic Research & Excellence: 386.98 out of 400
- Industry Interface & Placement: 192.2 out of 200
- Infrastructure & Facilities: 136.43 out of 150

These results clearly show that the university has established itself in quality research, strong industry collaboration, and modern infrastructure—successfully providing students with a world-class education.

Pune Mirror 17.8.2025

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

पुढारी

# विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये एकात्म मानवदर्शन उपक्रम राबवा

- उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचे निर्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानवदर्शन हा विचार विशद करणारी व्याख्याने दिली होती. त्याला यंदा ६० वर्षे पूर्ण होत आहे. त्यानिमित्त या हीरकमहोत्सवी वर्षामध्ये विद्यापीठ, महाविद्यालय स्तरावर एकात्म मानवदर्शन उपक्रम राबवावेत, असे निर्देश उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिले आहेत.

डॉ. देवळाणकर यांनी दिलेल्या निर्देशानुसार, युवा वर्गाच्या सक्षम व प्रभावी सहभागावर सामर्थ्यशाली राष्ट्राची निर्मिती अवलंबून असते. जगभरात सर्वात जास्त युवा वर्ग असणाऱ्या भारत देशातील युवा वर्गास त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देणे व त्यांना राष्ट्रनिर्माण कार्यात सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. याच जाणिवेतून पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित एकात्म मानवदर्शन हा लोक कल्याणकारी विचार राष्ट्राला दिला आहे. त्यापार्श्वभूमीवर विद्यापीठे तसेच महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम राबविण्यास सांगितले आहे.

उपक्रमांमध्ये एकात्मिक मानवतावाद निबंध, भाषण, वादविवाद, पथनाट्ये या विषयावर स्पर्धा आयोजित करणे. तसेच, शॉर्ट फिल्मस, रोल्स आणि काव्यलेखन आदी कार्यक्रम घेण्यास सांगितले आहे. तसेच, कार्यक्रमांचे आयोजन व समन्वयन साधण्यासाठी विद्यापीठ स्तरावर तसेच महाविद्यालय स्तरावर एक प्रभारी प्राध्यापकाची नियुक्ती करावी. सहभागी विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र, विजेत्यांना बक्षिसे आणि गुणवत्ता प्रमाणपत्रे देण्यात यावीत. विद्यापीठ स्तरावर एकात्मिक मानवतावादावर एक अध्यासन स्थापन करण्यात यावे. विद्यापीठ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनावरील संबंधित साहित्याचा स्वतंत्र विभाग करून विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रवृत्त करावे. संबंधित उपक्रम दि.२२ एप्रिल २०२६ पर्यंत सुरू राहतील, अशा प्रकारचे नियोजन करण्यासंदर्भात कळविण्यात आले आहे. संबंधित निर्देशाच्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांना संबंधित उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

My Pune Edition
Aug 18, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

पुढारी

**संक्षिप्त**

## पावसामुळे अकरावी प्रवेशाला २२ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**पुणे :** राज्यातील काही जिल्ह्यांत पडत असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर अकरावीच्या प्रवेशासाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने घेतला आहे त्यानुसार सर्वांसाठी खुला या अंतर्गत विशेष फेरीतील विद्यार्थ्यांना २२ ऑगस्टपर्यंत प्रवेश घेता येणार आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्यातील ९ हजार ५२५ कनिष्ठ महाविद्यालयातील २१ लाख ५० हजार १३० जागांसाठी केंद्रीभूत ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. त्यात आतापर्यंत १२ लाख ३ हजार ४१६ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. १५ ते १७ ऑगस्ट या कालावधीत नोंदणी करणे, प्राधान्यक्रम नोंदवण्यासाठी मुदत दिली होती. या फेरीच्या वेळापत्रकानुसार प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची निवडयादी १९ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यात काही जिल्ह्यांमध्ये होत असलेल्या मुसळधार पावसामुळे उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना सुटी दिली आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी १९ आणि २० ऑगस्टपर्यंत देण्यात आलेल्या कालावधीमध्ये २२ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे डॉ. पालकर यांनी स्पष्ट केले.

Pudhari 19.8.2025

# *News Paper Clippings During August 2025*

## *Section: Education*

प्रभात

www.dainikprabhat.com

## अकरावीच्या प्रवेशासाठी २२ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**पुणे, दि. १९ -** राज्यात काही जिल्ह्यांत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे अकरावी प्रवेशासाठी मुदतवाढ दिली असून सर्वांसाठी खुला फेरीतून विद्यार्थ्यांना २२ ऑगस्टपर्यंत प्रवेश घेता येईल.

राज्यातील ९ हजार ५२५ कनिष्ठ महाविद्यालयातील २१ लाख ५० हजार १३० जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. त्यात आतापर्यंत १२ लाख ३ हजार ४१६ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. आतापर्यंतच्या फेऱ्यांमध्ये प्रवेश न मिळालेले विद्यार्थी, पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी, एटीकेटी विद्यार्थ्यांसाठी सर्वांसाठी खुला या फेरीअंतर्गत विशेष फेरी राबवण्यात येत आहे. त्यासाठी १७ ऑगस्ट मुदत होती. राज्यात काही जिल्ह्यांमध्ये होत असलेल्या मुसळधार पावसामुळे उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना सुटी देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी २० ऑगस्टपर्यंत दिलेली मुदत २२ ऑगस्टपर्यंत वाढवली आहे.

Pune City Edition
Aug 20, 2025 Page No. 15
Powered by: erelego.com

## पाच लाख मुलींना दरमहा २ हजार रुपये

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

राज्यात उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण वाढावे, यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यार्थिनींसाठी 'कमवा आणि शिका' योजना आखण्याचे काम हाती घेतल्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. या योजनेमार्फत विद्यार्थिनींना त्यांच्या अध्ययनाच्या काळातच मासिक दोन हजार रुपये कमावता येणार आहेत.

या योजनेचा आराखडा तयार होत आहे. प्रत्येक महाविद्यालय त्यांच्याकडील विद्यार्थिनींना काही प्रकारचा रोजगार देण्यासाठी प्रयत्न करेल. तसेच अशा विद्यार्थिनींची यादी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे मागवली जाईल, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

Maharashtra Times 20.8.2025

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# पीएचडीची प्रवेश प्रक्रिया लांबणीवर



**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २४** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी प्रवेश प्रक्रिया लांबणीवर पडणार असल्याचे स्पष्ट होत आहे. पीएचडी प्रवेशासाठी विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रांमधील मार्गदर्शकांकडे (पीएचडी गाइड) उपलब्ध असलेल्या रिक्त जागांची माहिती ऑनलाइन मागविली आहे. त्यामुळे दुसरी फेरी सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात सुरू होण्याची चिन्हे आहेत.

विद्यापीठाने नुकतेच एक परिपत्रक प्रसिद्ध केले. त्यात मार्गदर्शकांकडे (पीएचडी गाइड) उपलब्ध असलेल्या रिक्त जागांची माहिती सादर करण्यासाठी ऑगस्टअखेरपर्यंत मुदत वाढविली आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने दिलेल्या माहितीनुसार संशोधन केंद्रांनी दिलेल्या मुदतीत रिक्त जागांची माहिती सादर करणे अत्यावश्यक आहे. ही माहिती सादर करताना तांत्रिक अडचणी आल्यास, संबंधितांनी प्रशासकीय भवन, पहिला मजला येथे संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

Pune City Edition
Aug 25, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

लोकमत

# उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमिलेयर मिळवा महाविद्यालयातच; 'सेवा केंद्र' सुरू होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असलेल्या विविध दाखल्यांसाठी आता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सेतू केंद्रांकडे हलपाटे मारण्याची गरज नाही. जिल्ह्यांतील २०० हून अधिक महाविद्यालयांमध्ये लवकरच 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू केले जाणार आहे. या केंद्रांमुळे विद्यार्थ्यांना 'नॉन-क्रिमिलेयर' आणि उत्पन्नाच्या दाखल्यांसारखे अनेक महत्त्वाचे दाखले थेट महाविद्यालयातच मिळणार आहेत, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. या केंद्रांमधून १७ प्रकारच्या सेवा उपलब्ध होणार आहेत.

याबाबत अहिल्यानगर जिल्ह्यात १० तालुक्यांतील १५ महाविद्यालयांमध्ये प्रायोगिक प्रकल्प राबविण्यात आला. तो यशस्वी झाला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असणारे 'नॉन-क्रिमिलेयर' आणि उत्पन्नाचे दाखले मिळवण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागतो.

## केंद्रासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया

१ महाविद्यालयांना 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडे अर्ज करावा लागेल. जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी (दि.२९) याबाबत एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत मान्यताप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांना बोलावण्यात आले आहे. या वेळी, हे केंद्र विद्यार्थ्यांसाठी कसे फायदेशीर ठरेल आणि कोणत्या सेवा उपलब्ध असतील, याबद्दल माहिती दिली जाणार आहे.

२ महाविद्यालयाने अर्ज केल्यानंतर तो पालकमंत्री यांच्याकडे मान्यतेसाठी पाठवला जातो. मान्यता मिळाल्यावर जिल्हा प्रशासन संबंधित महाविद्यालयाची माहिती 'महा-आयटी'कडे पाठवते. त्यानंतर 'महा-आयटी'द्वारे लॉग-इन आयडी आणि पासवर्ड दिला जातो. या केंद्रांमधून मिळणाऱ्या दाखल्यांसाठी ५९ रुपये शुल्क आकारले जाईल. यापैकी ३२ रुपये केंद्र चालवणाऱ्या व्यक्तीला दिले जातात. हे केंद्र महाविद्यालयाने सुरू केल्यास त्यातील उत्पन्न महाविद्यालयाला मिळेल. यामुळे महाविद्यालयाच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल. 'कमवा आणि शिका' योजनेतील विद्यार्थ्यांच्या मदतीने हे केंद्र चालवता येऊ शकते. यामुळे सरकारवरील आर्थिक भारदेखील काही प्रमाणात कमी होईल.

३ हे केंद्र सुरू करणे खूप सोपे असून, यासाठी महाविद्यालयाला वेगळी कोणतीही गुंतवणूक करण्याची गरज नाही. महाविद्यालयात आधीपासून उपलब्ध असलेले संगणक, इंटरनेट आणि प्रिंटर वापरून हे केंद्र सहज सुरू करता येईल.

Pune Main
Page No. 10 Aug 26, 2025
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

# पुढारी

# महाविद्यालयांत 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू होणार

## विद्यार्थ्यांना महाविद्यालयातच नॉन-क्रिमिलेअरसह महत्त्वाचे दाखले उपलब्ध

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**आता विद्यार्थ्यांना विविध सरकारी दाखल्यांसाठी महाविद्यालयाबाहेर हेलपाटे मारावे लागणार नाहीत. लवकरच जिल्ह्यांतील २०० हून अधिक महाविद्यालयांमध्ये 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू केले जाणार आहे. जिल्हा प्रशासनाने ही माहिती दिली आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रासह उत्पन्न, रहिवास अशा महत्त्वाच्या १७ सेवांचा लाभ थेट महाविद्यालय परिसरात मिळणार आहे.**

अहिल्यानगर जिल्ह्यातील १० तालुक्यांतील १५ महाविद्यालयांत हा प्रयोग यशस्वी ठरला असून, त्याच धर्तीवर पुण्यासह राज्यातील २०० हून अधिक महाविद्यालयांमध्ये हे केंद्र उभारण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

**कार्यशाळा २९ ऑगस्ट रोजी**

महाविद्यालयांत सेवा केंद्र सुरू करण्यासाठी संबंधित महाविद्यालयांनी जिल्हा प्रशासनाकडे प्रस्ताव मांडणे आवश्यक आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे २९ ऑगस्ट रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून, मान्यताप्राप्त महाविद्यालयाचे प्राचार्य या कार्यशाळेला उपस्थित राहणार आहेत. या वेळी विद्यार्थ्यांना केंद्रामार्फत कोणकोणत्या सेवा दिल्या जाणार आहेत, त्याची माहिती दिली जाईल.

महाविद्यालयाकडून मागणी आल्यानंतर तो प्रस्ताव पालकमंत्र्यांकडे मान्यतेसाठी पाठविला जातो. मान्यता मिळाल्यावर जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक माहिती संकलित करून ती महाआयटीला पाठवली जाते. त्यानंतर महाआयटीकडून संबंधित महाविद्यालयाला लॉगिन आयडी व पासवर्ड उपलब्ध करून देण्यात येतो.

**सोपी अंमलबजावणी**

हे केंद्र सुरू करण्यासाठी महाविद्यालय प्रशासनाला स्वतंत्र पायाभूत सुविधा उभारण्याची गरज नाही. महाविद्यालयातील विद्यमान संगणक, इंटरनेट आणि प्रिंटरच्या साहाय्याने 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू करता येणार आहे.

**शुल्क व उत्पन्न**

'आपले सरकार सेवा केंद्र'च्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या प्रत्येक दाखल्यासाठी ५९ रुपये शुल्क आकारले जाते. त्यातील ३२ रुपये सेवा केंद्र चालविण्यासाठी दिले जातात. त्यामुळे महाविद्यालयाने हे केंद्र सुरू केल्यास त्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल तसेच 'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत विद्यार्थी ही सेवा पुरवू शकतील, ज्यामुळे सरकारवरील आर्थिक भारही काही प्रमाणात हलका होईल.

Pune Edition

Aug 26, 2025 Page No. 05

Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2025*

## *Section: Education*

लोकमत

# 'कमवा आणि शिका' : मुलींना मिळणार दरमहा दोन हजार रुपये!

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : महाविद्यालयीन विद्यार्थिनींना शिक्षण घेण्यासाठी आर्थिक भार लागावा म्हणून, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्रालयाने 'कमवा आणि शिका' योजना राबवित आहे. पात्र विद्यार्थिनींना महाविद्यालयामार्फत रोजगार देऊन दरमहा २ हजार रुपये कमावण्याची संधी मिळणार आहे. त्यातून विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य खरेदी आणि शिक्षणाचा खर्च भागवण्यास मदत मिळू शकणार आहे.

घरची स्थिती बेताची असल्यास अनेक पालक मुलांना शिक्षणासाठी संधी देतात आणि मुलींचे मात्र शिक्षण थांबवले जाते. परिणामी, उच्चशिक्षण घेणाऱ्यांमध्ये मुलींचा टक्का घसरतो. हळूहळू हे चित्र बदलत असून, यात सरकारही आर्थिक साहाय्य करत मुलींना दरमहा २ हजार रुपये देणार आहे.



### अडचणी होणार दूर

महिला शिक्षण आणि समाजातील त्यांचा सहभाग वाढवण्यासाठी शासन सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. याचाच भाग म्हणून मुलींना उच्चशिक्षण घेताना येणाऱ्या शैक्षणिक अडचणी दूर व्हाव्यात म्हणून कमवा आणि शिका योजनेंतर्गत दरमहा २ हजार रुपये आर्थिक साहाय्य देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

### काय आहे योजना?

उच्च शिक्षणात मुलींचा सहभाग वाढवण्यासाठी, महाराष्ट्र उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाकडून एक नवीन धोरण तयार केले जात आहे. अलीकडेच ८०० हून अधिक अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क माफ केले आहे. निवास आणि जेवणाचा खर्च भागविण्यासाठी ६,००० रुपयांचा मासिक निर्वाह भत्ताही जाहीर केला आहे. आता शैक्षणिक साहित्याची गरज भागविण्यासाठी लवकरच 'कमवा आणि शिका' योजना सुरू केली जात आहे. योजनेत सहभागी विद्यार्थिनींना महाविद्यालयांनी उपलब्ध करून दिलेल्या रोजगार संधींद्वारे २००० रुपये मासिक भत्ता मिळेल.

Hello Pune
Page No. 5 Aug 27, 2025
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During August 2025*

### *Section: Education*

पुढारी

# विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी नोडल अधिकारी

- महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय टास्क फोर्सशी करता येणार संवाद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

उच्च शिक्षण संस्थांमध्ये नैराश्यातून विद्यार्थी आत्महत्या करतात. या आत्महत्या रोखण्यासाठी आता महाविद्यालय स्तरावर एका नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करावी लागणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ.अभिजित कुलकर्णी यांनी तसे निर्देश दिले आहेत.

डॉ.कुलकर्णी यांनी दिलेल्या निर्देशानुसार, सर्वोच्च न्यायालयाने उच्च शैक्षणिक संस्थामधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या अनुषंगाने, विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यबाबतच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राष्ट्रीय टास्क फोर्स तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्याच्या वतीने नोडल अधिकारी म्हणून उच्च शिक्षण संचालनालयाच्या संचालकांची नेमणूक करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व शैक्षणिक संस्थानी राष्ट्रीय टास्क फोर्स यांना क्षेत्र भेटीमध्ये आवश्यक सहकार्य करण्यासाठी एका वरिष्ठ अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करावी तसेच सर्व विद्यापीठांनी राष्ट्रीय टास्क फोर्सच्या भेटी दरम्यान विविध आरक्षण कोट्यांतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध ठेवावी आणि विद्यार्थ्यांना कोणत्याही संकोचाशिवाय राष्ट्रीय टास्क फोर्सशी संवाद साधण्याची परवानगी दयावी, असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार राष्ट्रीय टास्क फोर्स यांना क्षेत्र भेटीमध्ये आवश्यक सहकार्य करण्यासाठी शासन निर्देशानुसार महाविद्यालयामधील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून तत्काळ नियुक्ती करावी, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

Pune Edition
Aug 28, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

# Condolence Message

कळविण्यात अत्यंत वाईट वाटते की, सोमवार दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजता श्री.सुरेश नारायण पटवर्धन यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास सदगती मिळो, ही ईश्वर चरणी प्रार्थना. त्यांच्यावर अंत्यविधी संस्कार आज दुपारी ३.३० वाजता वैकुंठ स्मशानभूमीत होणार आहेत.

श्री. पटवर्धन हे मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ येथे ग्रंथालयात ज्युनियर लायब्ररी असिस्टंट म्हणून महाविद्यालयाच्या सुरवातीपासून ते सेवा निवृत्त होईपर्यंत कार्यरत होते. अतिशय प्रामाणिक, सचोटीने आणि निष्ठा पूर्वक सेवेचा कालावधी पूर्ण केला......

ओम शांति:शांति:



# *Upcoming Events*

## September 2025

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 ***Raje Umaji Naik Jayanti***  |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 ***Keshav Sitaram Thackeray alias Prabodhankar Thackeray Jayanti***  | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 ***Pandit Deendayal Upadhyaya Jayanti***  | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | | | | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.com*